जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पहाटे घरात घुसून महिलेला मारहाण करत दागिने पळविले

नगर – पहाटेच्या वेळी लोखंडी रॉड व गिलवर घेवून महिलेच्या घरात घुसत तिला मारहाण करत तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने तसेच घरासमोरील मोपेड असा २ लाख ९० हजारांचा ऐवज चार अनोळखी चोरट्यांनी पळवून नेल्याची घटना केडगाव उपनगरात लिंक रोड वर असलेल्या पोद्दार शाळेजवळील सिद्धांत पार्क येथे १६ सप्टेंबर रोजी पहाटे २.२३ च्या सुमारास घडली आहे.

याबाबत दुर्गा भागवत सोनार (वय ३८, रा. सिद्धांत पार्क, लिंक रोड, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या रात्री घरात झोपलेल्या असताना १६ सप्टेंबर रोजी पहाटे २.२३ च्या सुमारास ४ अनोळखी चोरटे हे हातात लोखंडी रॉड व गिलवर घेवून त्यांच्या घरात घुसले. त्यांनी फिर्यादी यांना हत्यारांचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावण्याचा प्रयत्न करू लागले असता, फिर्यादीने त्यांना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी एकाने गिलवरीने त्यांना दगड फेकून मारले, तर इतरांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर अंगावरील सोन्याचे दागिने तसेच घरासमोरील सुझुकी कंपनीची मोपेड असा २ लाख ९० हजारांचा ऐवज बळजबरीने चोरून नेला.

या घटनेची माहिती मिळाल्यावर पोलिस उपअधीक्षक शिरीष वमने, कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे स. पो.नि. तेजश्री थोरात यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली. या प्रकरणी दुर्गा भागवत सोनार यांच्या फिर्यादी वरून अनोळखी ४ चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०९(६), ३११, ११५ (२), ३५१ (२), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संघटितपणे दरोडा, घरफोड्या करणाऱ्या गुन्हेगारी टोळीवर ‘मोक्का’ची कारवाई

**नागेश भोसले टोळीवर अहिल्यानगर, पुणे जिल्ह्यात आहेत १६ गंभीर गुन्हे दाखल**

नगर – अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यात संघटीतपणे दरोडा, जबरी चोरी, घरफोडी व चोरी यासारखे एकुण १६ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या नागेश विक्रम भोसले व त्याच्या टोळी विरुद्ध जिल्हा पोलिस दलाने मोक्का कायद्यान्वये कारवाई केली आहे.

पारनेर तालुक्यातील पठारवस्ती, सोबलेवाडी या ठिकाणी २५ जानेवारी २०२५ रोजी फिर्यादी यांचे राहते घरात अनोळखी चोरटयांनी घराचा दरवाजा तोडुन लोखंडी सळई व लाकडी दांडके घेऊन घरात प्रवेश करुन फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी करुन साक्षीदार यांचे अंगावरील सोन्याचे दागिने, रोख रक्कम तसेच मोटरसायकल असा एकुण २ लाख ७५ हजारांचा ऐवज दरोडा टाकुन चोरुन नेला होता. या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०९ (६), ३२४(४), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासात सदरचा गुन्हा आरोपी सिध्देश सादीश काळे, अजय सादीश काळे, धिरज सादीश काळे, नागेश विक्रम भोसले, गणेश सुरेश भोसले, बाळू झारु भोसले, आवडया सुभाष उर्फ टुब्या भोसले, श्रीहरी हरदास चव्हाण, देवीदास जैनू काळे व विधीसंघर्षीत बालक यांनी केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. त्यावरुन काही आरोपींना सदर गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आलेली आहे.

सदर आरोपींच्या टोळीने अहिल्यानगर जिल्हयातील पारनेर, सुपा, एम.आय. डी.सी, भिंगार कॅम्प व बेलवंडी पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या दरोडा, जबरी चोरी, घरफोडी व चोरी अशा विविध गुन्हयांची कबुली दिली होती. त्यावरुन या टोळीविरुध्द नाशिक परिक्षेत्र चे विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे आदेशान्वये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम कायद्यान्वये गुन्हयात कलमवाढ करुन गुन्हयाचा सखोल तपास करुन या टोळीविरुध्द अपर पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे पुर्वपरवानगीने मोक्का न्यायालयात दोषारोपपत्र सादर करुन आरोपी नागेश विक्रम भोसले व त्याचे साथीदार यांचे टोळीविरुध्द मोक्का कायद्यान्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

आरोपी नागेश विक्रम भोसले व त्याचे साथीदार यांचे टोळीविरुध्द अहिल्यानगर व पुणे जिल्हयात संघटीतपणे दरोडा, जबरी चोरी, घरफोडी व चोरी यासारखे एकुण १६ गुन्हे दाखल आहेत. त्यांचेपासुन जनसामान्यांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता. त्यामुळे या गुन्हेगारी टोळीविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम कायद्यान्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांचे मार्गदर्शनाखाली तत्कालीन पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, नगर ग्रामीणचे पोलिस उपअधीक्षक शिरीष वमने, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी, पारनेरचे पो.नि. समीर बारवकर, स.पो.नि.अभय दंडगव्हाळ, पोलिस अंमलदार रवींद्र पांडे, निखिल मुरुमकर, अभिजीत बोरुडे, सचिन वीर, विवेक दळवी यांचे पथकाने केली आहे.

# केडगाव, नेप्ती रस्त्यावर गतिरोधक बसवून उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्यात यावे

नगर – केडगाव, नेप्ती रस्त्यावर गतिरोधक बसवून उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, या मागणीचे निवेदन शिवसेनेच्या माजी नगरसेविका श्रीमती सुनीता संजय कोतकर यांच्यावतीने सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले.


केडगाव येथील अर्चना हॉटेल नेप्ती रोड रस्त्याला गतिरोधक करण्याबाबत व उर्वरित रस्त्याचे राहिलेले काम पूर्ण करण्यात यावे, या मागणीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाला देताना विभाग प्रमुख संग्राम कोतकर.

निवेदनात म्हटले आहे की, मी श्रीमती सुनिता कोतकर नगरसेविका प्रभाग नं. १६, उपरोक्त विषयान्वये मी प्रभागातील ग्रामस्थांच्यावतीने मागणी करित आहोत की, केडगाव येथील अर्चना हॉटेल येथून नेप्ती गाव येथे जाणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून, काही उर्वरित काम जसे की साईड गटार व साईड पट्टीचे काम आणखी मार्गी लागलेले नाही. यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे तसेच अपघाताच्या घटनाही होवू शकतात. या रस्त्यावर नागरी वसाहत व रहदारी वाढली आहे तसेच या मार्गावरून कांदा मार्केटच्या अवजड गाड्या ये–जा करतात, यामुळे येथील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थांना व प्रभागातील नागरिकांना जीव धोक्यात घेऊन रहावे लागत आहे. वरील बाबींचा विचार करून या रस्त्यावर स्पीड ब्रेकर व साईड गटार व साईड पट्टीचे काम लवकरात लवकर पूर्णत्वास न्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

काम न झाल्यास प्रभागातील नागरिकांसमवेत घेऊन आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे, अशी माहिती शिवसेना विभाग प्रमुख संग्राम कोतकर यांनी दिली.

# शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे तहसील कार्यालयासमोर भजन आंदोलन

नगर – शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयासमोर भजन आंदोलन करून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी नाशिक, छत्रपती संभाजीनगर संपर्कप्रमुख व जिल्हाध्यक्ष विनोद सिंग परदेशी, जिल्हा मुख्य सल्लागार भगवान भोगाडे, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश ठाणगे, जिल्हा उपाध्यक्ष पप्पू येवले, जिल्हा सचिव प्रकाश बेरड, जिल्हा समन्वयक विजुभाऊ भंडारे, तालुकाध्यक्ष शंकर बेरड, शेतकरी तालुकाध्यक्ष प्रवीण पिंपळे, सेल तालुका अध्यक्ष नाना पारधे, युवक जिल्हाध्यक्ष सुरज ठोकळ, युवक तालुका अध्यक्ष सागर जाधव, तालुका उपाध्यक्ष भरत कांगुर्णे, शहराध्यक्ष कृष्णा खिळे, श्रीगोंदा विधानसभा अध्यक्ष वामन भदे, श्रीगोंदा तालुका अध्यक्ष सुरेश सुपेकर, प्रसिद्धी प्रमुख जिल्हा दिव्यांग पोपट शेळके, नगर तालुका किशोर सूर्यवंशी आदीसह शेतकरी उपस्थित होते.


शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे तहसील कार्यालयासमोर भजन आंदोलन करण्यात आले.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, सरकारी योजनांचा लाभ त्वरित मिळावा, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, राज्य निवृत्ती वेतन योजना यासारख्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठीची प्रक्रिया सोपी करावी व त्यांना त्वरित मदत मिळावी तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात याव्यात व विधवा महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी रोजगार किंवा स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे तसेच शेती मोजणीचे कामे त्वरित केली जावीत, शेतकरी मोजणीचा अर्ज करून देखील तातडीची मोजणी लवकर उपलब्ध होत नाही त्याची प्रक्रिया सोपी करून लवकरात लवकर मोजणी व्हावी यासाठी प्रयत्न करावे तसेच शेतकरी विधवा दिव्यांग यांना न्याय मिळवून देणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास त्यांच्यावर आणखी मोठे संकट येऊ शकते त्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, विधवा महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी योजनांचा लाभ मिळवून देणे, शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देणे या मागण्या देखील करण्यात आल्या.

निवेदन स्विकारताना तहसीलदारांनी योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. मात्र, २९ सप्टेंबरपर्यंत मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष विनोदसिंग परदेशी यांनी दिला.

या आंदोलनावेळी कार्यकर्त्यांनी कीर्तन–भजनातून शासनाचे लक्ष वेधत मागण्यांसाठी आवाज उठवला. जिल्हाध्यक्ष परदेशी यांनी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सतत लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला.

# शेतात पंचनामा सुरू असताना शेतकऱ्याची अधिकाऱ्यांसमक्ष विहिरीत उडी घेत आत्महत्या

पैठण – छत्रपती संभाजीनगरच्या पैठण तालुक्यातील खादगाव येथील शेतकरी संजय शेषराव कोहकडे (वय ४५) यांनी १६ सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजता महसूल अधिकाऱ्यांसमक्ष विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. कोहकडे यांनी शेतात पाणी साचत असल्यावरून त्यांनी तक्रार केली होती. त्या तक्रारीवर पंचनामा करण्यासाठी बालानगरचे मंडळ अधिकारी शुभांगी शिंदे आणि तलाठी लक्ष्मीकांत गोजरे हे घटनास्थळी आले असताना त्यांच्या समोरच कोहकडे यांनी विहिरीत उडी घेतली.


संजय कोहकडे (मयत)

कोहकडे यांची शेती खादगाव–खेर्डा रस्त्यालगत आहे. दोन्ही बाजूंनी नालीचे खोदकाम झाल्याने त्यांना शेतात जाण्यासाठी रस्ता नव्हता. तसेच शेतात पाणी साचू लागले. त्यांनी याबाबत अनेकदा महसूल अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. अधिकारी पंचनामा करत असताना कोहकडे यांनी आपली व्यथा सांगितली.

मात्र, अधिकाऱ्यांनी त्यांनाच झापल्याने ते संतापले. त्यांनी थेट विहिरीकडे धाव घेत अधिकाऱ्यांसमोरच उडी घेतली. काहींनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा मृत्यू झाला होता.

या घटनेनंतर कोहकडे यांचे नातेवाईक आक्रमक झाले. मंडळ अधिकारी, तलाठी आणि संबंधित शेतकऱ्यावर गुन्हा दाखल होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली. पाचोड ग्रामीण रुग्णालयात त्यांनी उत्तरीय तपासणीस नकार दिला. सहायक पोलिस निरीक्षक सचिन पंडित, उपनिरीक्षक राम बारहाते यांनी रुग्णालयात धाव घेतली. नातेवाईकांशी चर्चा करून कायदेशीर कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी उत्तरीय तपासणीस परवानगी दिली.

# ‘आयएमए’चे १८ व १९ सप्टेंबरला ‘राज्यव्यापी सेवा बंद आंदोलन’

नगर – महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषध द्रव्ये विभागाने नुकत्याच जारी केलेल्या परिपत्रकात महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलला सीसीएमपी कोर्स पास केलेल्या होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसाईकांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल मध्ये नोंदणी करून घेण्यासाठी निर्देश देण्यात आलेले आहेत. हा निर्णय आरोग्य सेवा व्यवस्थेच्या सुरक्षिततेसाठी व गुणवत्तेसाठी गंभीर धोका निर्माण करणारा असल्याचे आम्ही मानतो. संबंधित जीआर मागे नाही घेतल्यास आम्हाला आंदोलन तीव्र करावे लागेल व १८ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते १९ सप्टेंबर रोजी सकाळी ८ पर्यंत संपूर्ण राज्यभर एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्यात येणार आहे. २४ तासासाठी सर्व ॲलोपॅथी हॉस्पीटल मधील आरोग्यसेवा (आपत्कालीन सेवा सह) बंद ठेवण्यात येतील याची नोंद घ्यावी.

## सौ. मनिषाताई गुगळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सावेडी येथील संविधान भवन मागील रहिवासी सौ. मनिषाताई विनोद गुगळे (वय ५२) यांचे १६ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगी, जावई, दीर, भावजय, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे. त्या विनोद गुगळे यांच्या पत्नी तर किशोर गुगळे यांच्या वहिनी होत तसेच करिष्मा झांबड यांच्या आई, मनोज मुथ्था (मिरीवाला) यांच्या बहिण होत. सीए गौरव, सौरभ यांच्या काकू होत्या.



## मंगलबाई मुळे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – माणिक चौकातील रहिवासी श्रीमती मंगलबाई वसंतराव मुळे (वय ७८) यांचे ९ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, जावई, नात असा परिवार आहे.

## जनार्दन वाळुंजकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – शहरातील बुरुडगाव रोड परिरसरातील रहिवासी जनार्दन विठ्ठलराव वाळुंजकर (वय ८४) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सूना, जावई, नातवंडे व नातेवाईक असा परिवार आहे. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेत त्यांनी ३५ वर्षे सेवा केली.

## सतिश दुधेडिया यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर – येथील रहिवासी सतिश अमोलकचंद दुधेडिया (वय ७४) यांचे हृदयविकाराने निधन झाले.



त्यांच्यावर १७ सप्टेंबर रोजी वैकुंठधाम स्मशानभूमी, नवीपेठ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, सुन असा परिवार आहे.

# गंज बाजारातील सोन्याच्या दुकानातून चोरी करणाऱ्या कारागीरासह चौघांना पश्चिम बंगाल मधून केली अटक

**चोरलेले ७१ ग्रॅम सोने हस्तगत**

नगर – शहरातील गंजबाजार येथील सोन्याच्या दुकानातुन सोने चोरी करणाऱ्या बंगाली कारागीरासह चौघांना कोतवाली पोलीसांनी पश्चिम बंगाल येथून ताब्यात घेऊन या आरोपीकडुन चोरलेले ७१ ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत.

गंजबाजारात तील गांजे गल्ली येथे रमजान सलाम पियादा (रा. धरती चौक, अहिल्यानगर) यांचे रमजान पॉलिश व कारागीर हे दुकान आहे. १६ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारच्या सुमारास फिर्यादी हे नमाजकरिता बाहेर गेले असता त्यांच्या दुकानातील बंगाली कारागीर अरमान अली कुरबानअली शेख, (रा.उत्तर अभिरामपुर, जिल्हा– हुगली, पश्चिम बंगाल) याने दुकानातील एकूण ९३ ग्रॅम वजनाचे ४ लाख ८० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. सदर गुन्ह्याचा तपास कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी महिला स.पो.नि.तेजश्री थोरात यांचेकडे दिला होता.


गंज बाजारातील सोन्याच्या दुकानातून चोरी करणाऱ्या कारागीरासह चौघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

गुन्ह्याच्या तपासात आरोपी अरमान अली शेख याने त्याचे साथीदार नझरुल नुर हुसैन, आसिफ खलील शेख यांचेकडे काही सोन्याचे दागिने विल्वेवाट लावण्याकरिता दिले तसेच काही दागिने बस्तरा, पश्चिम बंगाल येथील सराफ व्यवसायीक अब्दुलनसीम शेख यास विक्री केल्याचे खात्रीलायक माहीती मिळाली. त्यामुळे पोलिस पथकाने हुगली,पश्चिम बंगाल येथे जावून या चौघांना ताब्यात घेत नगरला आणले. त्यानंतर त्यांच्या नातेवाईकांकडून चोरलेले सोने हस्तगत करण्यात आले आहे. चोरीस गेलेल्या ९३ ग्रॅम दागिन्यांपैकी ७१ ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले असुन उर्वरीत मुद्देमालाबाबत आरोपीकडे चौकशी सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, यांचे मार्गदर्शनाखाली स. पो.नि. तेजश्री थोरात, उपनिरीक्षक गणेश देशमुख, पो.हे.कॉ.बाळकृष्ण दौंड, विनोद बोरगे, सलीम शेख, विशाल दळवी, सुर्यकांत डाके, विक्रम वाघमारे, संदिप पितळे,पो.कॉ. सत्यजित शिंदे, अमोल गाडे, अतुल काजळे, महेश पवार, अतुल कोतकर, शिरीष तरटे, दक्षिण विभाग मोबाईल सेलचे पो.कॉ.राहुल गुंडु यांनी केली आहे.

## प्रोफेसर चौकातून दुचाकीची चोरी

नगर – सावेडी उपनगरातील प्रोफेसर कॉलनी चौकातील दुनियादारी चहा सेंटर समोर उभी केलेली हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (एमएच १० सीटी ३३९४) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत गणेश शिवाजी दरेकर (वय ३०, रा. खंडाळा, ता.नगर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# गोवंशीय जनावरांची कत्तल करुन रस्त्यावर ॲनिमल वेस्ट फेकणाऱ्याला पकडले

नगर – राज्यात गोहत्या आणि गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यास प्रतिबंध असतानाही गोवंशीय जनावरांची कत्तल करून ॲनिमल वेस्ट कोठला परिसरात महामार्गालगत फेकणाऱ्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. तरबेज आबीद कुरेशी (वय २४, रा. व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट) असे या आरोपीचे नाव आहे.


गोवंशीय जनावरांची कत्तल करुन रस्त्यावर ॲनिमल वेस्ट फेकणाऱ्याला पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

गोमांसचे ॲनिमल वेस्ट कोठला परिसरात फेकण्यात आल्याचे समोर आल्यावर नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत होता. तसेच आ. संग्राम जगताप, आ. विक्रमसिंह पाचपुते यांच्यासह हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी रास्ता रोको आंदोलन केले होते. घटनेचे गांभीर्य ओळखून भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात पो.हे.कॉ. अजय गव्हाणे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. किरणकुमार कबाडी यांनी तात्काळ पोलिस अंमलदार दिपक घाटकर, सुनिल पवार, गणेश धोत्रे, शाहीद शेख, फुरकान शेख, भिमराज खर्से, सतिष भवर, योगेश कर्डीले, प्रशांत राठोड, भाग्यश्री भिटे, छाया माळी यांचे पथक नेमून तपास सुरु केला. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्ह्यात वापरलेली मोपेड गाडी ही तरबेज कुरेशी याची असल्याचे समोर आल्यावर त्याला ताब्यात घेतले. त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने सांगितले की, त्यांने दोन बैल गोवंश यांची राहते घरी कत्तल करुन, त्याचे मांस विक्री केले आहे. सदर कत्तल केले नंतर वेस्ट मांस व अवशेष हे फेकुन देणे करीता ओळखीच्या अल्पवयीन मुलांना पैसे व मोपेड देवुन पाठविले होते असे सांगितले. त्याला मोपेड गाडीसह पुढील तपासासाठी भिंगार कॅम्प पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

आयुर्वेदानुसार खजूर आणि तूप हे ऊर्जेचे चांगले स्रोत आहेत. तसेच, कफ, चिंता आणि तणाव व हाडांच्या आरोग्यासाठी देखील तूप चांगले मानले जाते. जर तुम्हाला बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल तर तुम्ही विशेषतः तुमच्या दिनचर्येत खजूर आणि तुपाचा समावेश करावा. खजूरमध्ये भरपूर फायबर असते आणि तुपासोबत ते पोटाचे पचन सुरळीत करण्याचे काम करते. तूप आणि खजूर यांचे मिश्रण त्वचेसाठी आश्चर्यकारक आहे.

## पाककला

### तंदूर रोटी

**साहित्य :** २.५ कप कणीक, १ टीस्पून साखर, १ टीस्पून बेकिंग पावडर, १/४ टीस्पून बेकिंग सोडा, मीठ चवीनुसार, तेल, पाणी, १/२ कप दही

**कृती :** प्रथम एका परातीमध्ये कणिक घ्या आता यामध्ये साखर, मीठ, बेकिंग सोडा, बेकिंग पावडर घालून व्यवस्थित मिक्स करून घ्या. नंतर त्यामध्ये दही घालून कणिक हाताने मळून घ्या. आता पाणी घालून ५ ते ७ मिनिट कणीक मळून घ्या. वरुन ३ ते ४ चमचे तेल घालून छान मऊसर मळून घ्या. आता या कणकेला पंच मारुन फोल्ड करा.असे ४ ते ५ वेळा करा आणि कणीक आतल्या बाजूला दुमडून ठेवा. वरुन तेल लावून कणीक तासभर झाकून ठेवा. आता एकीकडे मंद आचेवर तवा तापत ठेवा. नंतर ही कणीक पुन्हा छान मळून घ्या आणि आतल्या बाजूला दुमडा. कणकीचे गोळे करुन ठेवा. आता पोळपाटावर एक एक गोळा घेऊन परत आत दुमडून गव्हाच्या पीठावर जरा जाड लाटून घ्या. आता या पोळीवर सर्व बाजूने ३ टीस्पून पाणी टाकून व्यवस्थित पसरवा. आता तव्यावर पोळीची पाणी लावलेली बाजू टाकून वरुन पोळी हलक्या हाताने दाबा. एक मिनीट पोळी भाजून घ्या. पोळीवर फोड आलेले दिसतात. आता रोटीसकट तवा उलटा धरुन गॅसवर दुसऱ्या बाजूने रोटी खमंग भाजून घ्यावी. रोटी भाजली गेली की तवा पुन्हा गॅसवर ठेवून रोटी वर बटर घालून भाजून घ्यावी आणि कालथ्याने रोटी काढून घ्या.

## वास्तू

घरात सुख-समाधान लाभण्यासाठी, आशावादी, उत्साहवर्धक आनंददायक चित्रेच घरात लावावीत.

## सल्ला

लोणचे घालण्यापूर्वी फळे व्यवस्थित धुवून स्वच्छ फडक्याने पुसून सुकवून घ्या. पाणी राहिल्यास लोणच्यात बुरशी लागण्याची भीती राहते. लोणच्यात मिठाचे प्रमाण योग्य असणे अत्यावश्यक असते.

## सौंदर्य

* एक कप दूध चांगलं आटवावे. दाट झाल्यावर एक लिंबू पिळून दूध थंड करावे. रात्री झोपताना ते चेहऱ्यावर लावून चोळावे. रात्रभर लावून ठेवावे. सकाळी धुवून घ्यावे. यामुळे मुरमे बरी होऊन चेहरा उजळून तजेलदार होतो.

* प्रौढ त्वचेच्या लोकांसाठी सनस्क्रिन लावणे महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे त्वचेच्या माईश्चरायझिंगला प्राधान्य द्या.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १८ सप्टेंबर २०२५

**द्वादशी श्राद्ध, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, पुष्य ०६।३३, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आपली स्थिति, वास्तविकता वाढेल. पारिवारिकदृष्ट्या वेळ सामान्य. कामाचा ताण जाणवेल. नोकरीत कुणावरही विश्वास ठेवू नये.

**वृषभ :** उत्साह, आत्मविश्वास वाढेल. अडकलेला पैसा मिळेल. मनोरंजनात वेळ जाईल. अडचणी राहतील. मिळकती पेक्षा जास्त खर्च होईल. अनिश्चितता वाटेल.

**मिथुन :** खासगी कामाकडे जास्त लक्ष द्या. पैसा मिळेल. जबाबदारीची कामे पडतील. नोकरीत नुकसानी संभव. कामात पारदर्शकता हवी. वैचारिक धारणेत राहू नका.

**कर्क :** शत्रुपक्ष हावी राहील. एखाद्या चुकीला पुन्हा करु नका. मन रमणार नाही. विश्वास कमी राहील. सामाजिक मान-सन्मान वाढेल. व्यापारिक लाभ आणि सुख-समृद्धि वाढेल.

**सिंह :** मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल. साथ लाभेल. व्यक्तिगत कामात उन्नति होईल. यंत्रे व वाहने जपून चालवावीत.

**कन्या :** अडकलेला पैसा मिळेल. गूढ अनुसंधान करणाऱ्यांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील. व्यर्थ ताण जाणवेल. पारिवारिक वाद वाढतील.

**तूळ :** आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. आपल्या प्रयत्नांमुळे व्यापारात वृद्धि होईल. नवीन कामांना चालना मिळेल.

**वृश्चिक :** आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता.

**धनु :** संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल. वातावरण उत्साहवर्धक राहील.

**मकर :** आपली दूरदृष्टि आणि बुद्धिने अडकलेली कामे पूर्ण होतील. सामाजिक यश. नवीन कार्य सुरु करू नका. विरोधकांपासून दूर रहा. यश मिळणार नाही.

**कुंभ :** आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे. कामांची गती मंदावेल. शांत रहा. लाभदायक बातमी कळेल. आर्थिक उन्नति होईल. परिस्थिति शांतपणे हाताळा.

**मीन :** अडकलेला पैसा मिळेल. भूमि, घर विकत घेण्याचे योग. आरोग्यात सुधारणा. आर्थिक स्थितीत बचत आणि निवेशाचे योग येतील. लाभदायी करार होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२६५ सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७२६४ चे उत्तर**



**आडवे शब्द :-** १) कपडा, कापड, वस्त्र ५) भक्कम, दृढ, निश्चयी, पक्का ७) या निवृत्त भारतीय क्रिकेटपटूला 'विक्रमादित्य' असे म्हटले जाते १०) हर, प्रत्येक, किंमत, भाव ११) उष्णतेमुळे त्वचेतून बाहेर पडणारे पाणी १२) चिलखत, साल, आवरण १५) यावर्षी १६) अरबी देव १८) दिवाळीत या मातीच्या दिवलीत हमखास दिवा लावला जातो १९) हॉस्पिटल, रुग्णालय २१) गजानन महाराजांचे गाव २२) लहान मुलांचा एक खेळ २३) घोडा वगैरेंवर बसून मारलेली फेरी

**उभे शब्द :-** १) धरती, रसा, पृथ्वी २) सुनील गावसकरचे टोपणनाव ३) महाभारत कथेतील निषध देशाचे राजाराणी ४) पळून काढलेले अंतर ५) किरकोळ नसलेले, घाऊक ६) कापसाचे बी ८) खोड, शीतल ९) सवय, अभ्यास १३) सूत कातण्याचे चक्र १४) हातपाय पसरुन, सर्व अंग टेकून १७) घडण, रचना, नक्कल १९) विश्वासाला तडा, विश्वासघात २०) येणेजाणे, राबता, वर्दळ, शेत, रान २१) तळलेला एक खमंग खाद्यपदार्थ

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** परिश्रम म्हणजे जीवनाच्या साफल्याचे रहस्य व आत्म्याचे भूषण आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### ना एसी, ना कूलर.. तरीही पूर्वीच्या काळात कसं राहायचं घर थंड?

उन्हाळ्यात एसी आणि कूलरशिवायही घर थंड ठेवणे ही काही नवीन गोष्ट नाहीये. अशा अनेक स्वदेशी पद्धती शतकानुशतके वापरल्या जात आहेत आणि आजही त्या प्रभावी मानल्या जातात. चांगली गोष्ट म्हणजे यामुळे वीज वाचण्यास देखील मदत होऊ शकते.

जुन्या काळात घरांच्या भिंती खूप जाड होत्या आणि छत देखील उंच केले जात असे. कारण जाड भिंती बाहेरील उष्णता आत जाण्यापासून रोखतात आणि इन्सुलेटर म्हणून काम करतात. त्यामुळे घर थंड राहते आणि गरमीपासून आराम मिळतो. थेट सूर्यप्रकाशापासून संरक्षणासाठी बाल्कनी आणि सावल्यांचा वापर प्रभावी मानला जात होता. घरांमध्ये खिडक्या आणि लांब बाल्कनी बांधल्या गेल्या होत्या, ज्यामुळे सूर्याचे थेट किरण घरात येऊ शकत नव्हते. तर सावल्यांनी भिंतींना दिवसाच्या सूर्यप्रकाशापासून गरम होण्यापासून वाचवले. आजही तुम्ही डिझायनर शेड्स बसवू शकता, ज्यामुळे तुमचे घर सुंदर होईल.

जुन्या घरांमध्ये, क्रॉस-व्हेंटिलेशनवर लक्ष केंद्रित केले जात असे. यासाठी, खिडक्या आणि दरवाजे एकमेकांच्या विरुद्ध बांधले गेले, जेणेकरून हवा सहज वाहू शकेल. गरम हवा बाहेर पडावी म्हणून छताजवळ लहान व्हेंटिलेटर बसवले होते. या काळातही, तुम्ही या प्रकारच्या खिडकी आणि एक्झॉस्ट फॅनचा वापर करू शकता. मातीची भांडी आणि टाइल्स, त्यांच्या थंड करण्याच्या गुणधर्मासाठी ओळखल्या जातात. प्राचीन काळी घरांना मातीचे छप्पर किंवा टेराकोटा टाइल्स असायचे. चिकणमाती ही एक नैसर्गिक इन्सुलेटर आहे आणि ती उष्णता शोषत नाही परंतु थंड राहते. आजही लोक त्यांच्या घरात टेराकोटाचे भांडे किंवा लहान सजावटीच्या वस्तू ठेवू शकतात, ज्यामुळे आजूबाजूचे वातावरण थंड राहण्यास मदत होते. जुन्या काळात, घराच्या मध्यभागी असलेले उघडे अंगण किंवा व्हरांडा क्रॉस-व्हेंटिलेशन आणि सूक्ष्म हवामान तयार करून थंड वातावरण निर्माण करत असे. आता, अंगणात विहीर आणि झाड असेल तर थंडपणा आणखी वाढतो. तथापि, या युगात, अंगण आणि विहीर मिळण्याची शक्यता कमी आहे. अशा परिस्थितीत, तुम्ही तुमच्या घराभोवती किंवा बाल्कनीमध्ये झाडे लावून उष्णतेपासून आराम मिळवू शकता.

### गाईचा महिमा

भागीरथी नदीच्या तीरी तेजपूर नगरीत पूर्वी ऋतंभर नावाचा राजा होता. संतानप्राप्तीसाठी जाबाली ऋषींनी त्याला गाईची पूजा करण्यास सांगितले. गाईचे तोंड, शेपूट, शिंगे, पाठ या सर्वांत देवाचे अस्तित्व असून जो गाईचे पूजन करतो, त्याचे मनोरथ पूर्ण होतात. या संदर्भात जाबाली मुनींनी राजा जनकाची एक कथा सांगितली.

एकदा योगसामर्थ्याने राजा जनकाने आपल्या शरीराचा त्याग केला. दिव्य देह धारण करून तो विमानात बसून निघून गेला. त्याने मागे सोडलेले शरीर त्याचे सेवक घेऊन गेले. राजा जनक यमधर्माच्या संयमनीपुरीच्या जवळून चालले होते. त्यावेळी नरकात पापी जीव यातना भोगीत होते. जनकाच्या शरीरास स्पर्शन येणाऱ्या हवेमुळे त्यांना छान वाटले. पण राजा तिथून दूर जाऊ लागला तेव्हा पुन्हा त्यांच्या यातना सुरु होऊन ते ओरडू लागले. जनकाने तेथून जाऊ नये अशी याचना करू लागले.. त्या दुःखी जिवांच्या करुण हाकांनी जनकाचे मन हेलावले. आपल्या इथे असण्याने जर एवढे जीव सुखी होत असतील, तर आपण येथेच राहावे. हाच आपला स्वर्ग असे वाटून जनक तेथेच नरकाच्या दाराशी थांबला.

धर्मराज यम तेथे आल्यावर जनकाला त्याने पाहिले व म्हणाला, आपण तर श्रेष्ठ धर्मात्मा ! आपण इथे कसे? हे पापी लोकांचे स्थान आहे यावर जनकांनी दुःखी जिवांची दया आल्यामुळे आपण तेथे थांबल्याचे सांगितले. तसेच या सर्वांना नरकातून सोडवत असाल तर मी तेथून जाईन, असेही ते म्हणाले. पण त्यांचा उद्धार करायचा असेल तर जनकाने आपले पुण्य अर्पण करावे, असे यमाने सांगितले. जनकाने तसे करताच सर्व पापी जीव नरकातून मुक्त होऊन परमधामास निघाले.

मग जनकाने यमधर्मास विचारले धार्मिक मनुष्य येथे येत नाही, मग माझे इथे येणे का झाले? यावर यमाने सांगितले, आपण पुण्यात्मा आहात, पण आपल्या हातून एक छोटं पाप घडलं. एकदा एक गाय चरत होती. आपण तिथे जाऊन तिचं चरणं थांबवलंत. पण आता आपले तेही पाप संपले असून दुःखी जिवांना मुक्त केल्याने पुण्याई वाढले आहे. हे ऐकून यमराजास प्रणाम करून राजा जनक परमधामास गेला.

## जीवन का अमृत (भाग १)



श्रीमद्भगवतगीता में एक श्लोक आया है, जिसका अर्थ है : जो सब प्राणियों के लिए रात्रि है, अंधेरा है, अनजान रास्ता है, उसमें संयमी पुरुष जागता है। संयम का अर्थ है- पाँच इन्द्रियों और मन को वश में करना। इन्द्रियों के भोग बाह्यमुखी प्रवृत्ति है। बाह्यमुखी प्रवृत्ति को रोककर मन की शक्ति को अंतर्मुख करना, दो भ्रूमध्य स्थिर करना संयम है। जब दो भ्रू-मध्य वृत्ति स्थिर होती है, तो प्रभु का प्रकाश आ जाता है, जो हमें निजधाम पहुँचा देता है।

### गुरु और परमात्मा

श्रीमद्भगवतगीता के उस श्लोक का अगला हिस्सा हमें बताता है : जिन भोगों में जीव जागते हैं, तल्लीन हैं, उन्हें मननशील महापुरुष (मुनि) अंध:कारमय रात्रि समझकर छोड़ देते हैं। ये भोग आत्मिक दृष्टि से आत्मा का पतन करनेवाले हैं, उसे अंधकार में भटकाने वाले हैं और ८४ लाख जियाजून के चक्कर में फंसा देने वाले हैं।

बुद्धि स्वार्थ, अहंकार या खुदगर्जी का अंधेरा है। इसके विपरीत, प्रभु का प्रेम या प्रभु की भक्ति, प्रकाश का ठाठे मारता हुआ समुद्र है। उल्लू, जिसे केवल अंधेरे में ही दिखाई देता है, उससे पूछा जाए कि दिन का उजाला कैसा है या जन्मान्ध से पूछा जाये कि सूर्य का प्रकाश कैसा है, दोनों इसका उत्तर नहीं दे सकेंगे । इसका उत्तर केवल आँखवाला ही दे सकेगा। इस प्रकार बुद्धि अंधकार है और भक्ति प्रकाश की किरण, मस्ती की महफिल है। संत दर्शनसिंह जी महाराज इस बारे में फ़रमाते

करे तलाशे जुनूं जुल्मते खिरद से कहो
जुनूँ किरण है, किरण के सिवा कुछ और नहीं

- मताओ नूर, गज़ल-१६

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

**१) ज्वारी की फसल :**

जमीन को शक्तिशाली बनाने के लिए १. प्रति एकड़ ६ टन गोबर की खाद या हरी खाद को जमीन में मिलाकर बीज बुवाई के लिए जमीन तैयार करें। २. बीज बुवाई के समय और उसके पश्चात प्रति २०-२० दिनों के अंतरों से २०० ली. जीवामृत एक एकड़ जमीन में जमीन गीली हो तब शाम के समय छिड़काएँ या पानी के साथ छोड़ दें या ड्रिप द्वारा छोड़ दें।

३. फसल एक मास की होने के बाद जमीन गीली हो तब एक एकड़ में एक टन केंचुएं की खाद । जमीन में मिलाएँ। मिक्स फसल १. खरीफ सीजन में ज्वारी में तुअर, मूंग, उड़द जैसी फसल मिक्स करना आवश्यक है जैसे छः लाइन ज्वारी के बाद, फिर एक लाइन तुअर या दो लाइन मूंग तथा उड़द इस प्रकार मिक्स करें। २. रब्बी सीजन में ज्वारी के साथ १०% धनिया मिक्स करके बीज बुवाई करें।

### आज्ञा चक्र

बीज संस्कार २० किलो बीज को बीजामृत लगाकर गीला करें, बीज के ऊपर से पहले ॲझोटोबॅक्टर या ॲझोस्पिरिलियम जीवाणु संवर्धक २५० ग्राम और फिर पी.एस.बी. जीवाणु संवर्धक २५० ग्राम का लेप चढ़ाएं। बीज को छांव में सूखने दें। आठ-दस घंटे में ही जमीन गीली हो तब बीज बुवाई करें। फसल संरक्षण १. पौधों के तनों में होनेवाली कीट, रस चूसने वाली कीट, छोटी-बड़ी इल्लियां तथा मि लीबग्ज और भुट्टों में होने वाली इल्लियां इन सभी के लिए प्रादुर्भाव दिखते ही (इसका प्रादुर्भाव कम होने तक) हफ्ते में एक या दो बार ४% गोमूत्र, नीम अर्क या दशपर्णी अर्क में से एक छिड़काएँ। पहले गोमूत्र, दूसरी बार नीम अर्क और तीसरी बार दशपर्णी अर्क ऐसे प्रयोग करें। (अगर तीनों ही उपलब्ध हैं तो ठीक है, नहीं हैं तो कोई भी एक ही दवा का छिड़काव कर सकते हैं।)

**२. टारफुल रोग** - पानी की कमी होने पर इसका प्रादुर्भाव दिखाई देता है, इसके लिए बीज को बीजामृत लगाकर १०% धनियां मिक्स करें।

**२) बाजरा की फसल** - जमीन को शक्तिशाली बनाने के लिए (इसके लिए ज्वारी जमीन को शक्तिशाली बनाने का ही फार्मुला प्रयोग करें।) मिक्स फसल - बाजरा के अंदर तुअर, मूंग, उड़द या मोठ जैसी फसल मिक्स करना आवश्यक है । छः लाइन बाजरा, फिर एक लाइन तुअर या दो लाइन मूंग, उड़द या मोठ में से एक-इस प्रकार मिक्स करें ।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गण्या : मला तुमच्या मुलीशी लग्न करायचंय
मुलीचा बाप : तुझी कमाई किती?
गण्या : ११ हजार
मुलीचा बाप : मी तिला महिना १० हजार रुपये फक्त पॉकेट मनी म्हणून देतो
गण्या : ते धरुनच सांगितलं....

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* पहिला स्टार्ट अप इंडीया इनोव्हेशन वीक केव्हा आयोजित केला गेला?
- १० ते १६ जानेवारी

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

## आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

जंतुसंसर्ग, क्षयरोगाची लागण, ॲनिमिया यांसारख्या आजारांमुळे पाळी येत नसेल तर त्यावर उपचार करून पाळी येऊ शकते.

रुग्णानुभव १ -

वय १६ वर्षे झाल्यावरही पाळी सुरू न झाल्यामुळे रुपाली आईसोबत तपासणीस आली होती. तिच्या आईने विचारले, मॅडम, हिने दहावीची परीक्षा दिली, तरीही अजून मासिक पाळी सुरू । झाली नाही. त्यासाठी आपल्याला काही उपचार करावे लागतील का? रुपालीला बघताक्षणी लक्षात आले की, तिची तब्येत अतिशय कृश होती. १६ वर्षांची असूनही १०-१२ वर्षांचीच वाटत होती. तिच्या बाबतीत माहिती विचारली असता तिच्या आईने सांगितले, की ही अभ्यासाची फार काळजी करते. जेवण वेळेवर करत नाही. फळे व भाज्या खात नाही. परीक्षेत चांगले गुण मिळावेत म्हणून उपवास करते. अभ्यासासाठी अति जागरण करते. तिच्या रक्ताची पाहणी केली असता रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी झालेले दिसले. सकस आहार न घेतल्यामुळे रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा, शुक्र या सप्तधातूंचे पोषण व्यवस्थित होत नव्हते. त्यामुळे वातप्रकोप झाला होता. रस, रक्तातील धातूंचे पोषण न झाल्यामुळे प्रकृतीत झालेला वात, त्याचा उपधातू असलेला रज (मासिक पाळी) चे पोषण होत नव्हते व त्यामुळे मासिक पाळी येत नव्हती. रुपालीची सोनोग्राफी केली असता तिचे गर्भाशय अस्तर, बीजकोष यांची पुरेशी वाढ झालेली नसल्याचे लक्षात आले. हे सर्व वातप्रकोपामुळेच झाले होते.

उपचार :

एकूणच रुपालीचा स्वभाव हळवा, अति काळजी करण्याचा होता. प्रथमतः मी तिला समजावले, आता परीक्षा संपली; त्यामुळे अभ्यासाची काळजी करू नकोस. अति जागरण झाल्याने व काळजी केल्याने तुझा वातप्रकोप झाला आहे. त्यामुळे तुझी मासिक पाळी सुरू झाली नाही. यावर उपाय म्हणजे वेळेवर जेवण करत जा व वेळेवर झोपत जा. जेवणामध्ये पालेभाज्या, ऋतूमधील सर्व फळे, फळभाज्या, मोड आलेली कडधान्यांचा समावेश हवा. जेवताना ताक, गाजर, बीट, टोमॅटोची कोशिंबीर, वरणभातामध्ये गायीचे दोन चमचे तूप अवश्य घेत जा. रात्री झोपताना सात-आठ काळे मनुके, दोन बदाम, दोन पिस्ता दुधात भिजवून सकाळी ते उपाशीपोटी खात जा. तसेच नाचणीचा लाडू, गूळ-शेंगदाणे, तीळ पापडी, तीळ व गूळ लाडू, मांसाहार करत असशील तर रोज एक उकडलेले अंडे, मटण सूप घेत जा. चार-पाच खजूर खात जा. आहाराकडे दुर्लक्ष केलेले आहे. जोपर्यंत तुझा आहार सुधारत नाही तोपर्यंत तुला मासिक पाळी व्यवस्थित येणार नाही. मन:शांतीसाठी योगासने, प्राणायाम, ओंकार करत जा. यामुळे तुला भूक लागेल व शरीराला ऑक्सिजनचा व्यवस्थित पुरवठा झाल्यामुळे तुझे आरोग्य सुधारेल. शरीरातील अंत:स्रावी ग्रंथींना चालना मिळून काही दिवसांतच मासिक पाळी सुरू होईल.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘शारदा’ व ‘ज्ञानेश्वर वाद करंडक’ ही विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व खुलवणारी स्पर्धा

## अजित बोरा यांचे प्रतिपादन; सारडा महाविद्यालयाच्या राज्यस्तरीय शारदा व ज्ञानेश्वर वाद करंडक स्पर्धेस राज्यातून प्रतिसाद

नगर – प्रेमराज सारडा महाविद्यालयात गेल्या ४९ वर्षांपासून अखंडितपणे शारदा व ज्ञानेश्वर वाद करंडक स्पर्धेचे आयोजन करून गौरवशाली परंपरा जपली जात आहे. ही स्पर्धा पूर्ण राज्यात नावाजलेली असल्याने या स्पर्धेला दरवर्षी मिळणारा प्रतिसाद वाढत आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व खुलवणारी ही स्पर्धा आहे, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा यांनी केले.


पेमराज सारडा महाविद्यालयात आयोजित शारदा व ज्ञानेश्वर वाद करंडक स्पर्धेचे उद्घटन करताना हिंद सेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा.

प्रेमराज सारडा महाविद्यालयात आयोजित शारदा व ज्ञानेश्वर वाद करंडक स्पर्धेचे उद्घाटन अजित बोरा यांनी शारदा व ज्ञानेश्वरांच्या चांदीच्या करंडकांच्या मूर्तींचे पूजन करून केले. यावेळी संस्थेच्या संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, प्रा.शरद गोखले, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे व प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक महेश कुलकर्णी, राजु रिक्कल, सुजित कुमावत, प्रबंधक अशोक असेरी, परीक्षक प्रा.डॉ.बापू चंदनशिवे, डॉ.शर्मिला पारधे, प्रा.अर्चना पंडित व साहित्यिका शर्मिला गोसावी आदी उपस्थित होते. या राज्यस्तरीय स्पर्धेला विविध जिल्यातील महाविद्यालयांच्या संघांचा प्रतिसाद मिळाला आहे.

प्रा.ज्योती कुलकर्णी म्हणाल्या, मोठी वैभवशाली परंपरा लाभलेल्या या शारदा व ज्ञानेश्वर वाद करंडक स्पर्धेत मी १९७१ साली भाग घेत विजेती ठरली होती. तेव्हापासून आजपर्यंत ही स्पर्धा आपले वेगळे अस्तीत्व टिकवून आहे. त्यामुळेच विविध जिल्ह्यातून या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

प्राचार्य माहेश्वरी गावित म्हणाल्या, पुढील वर्षी या स्पर्धेचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. त्यामुळे रौप्य महोत्सवी वर्षाची मोठ्या जल्लोषात यावर्षी पासूनच तयारी सुरु केली आहे. वाद स्पर्धेला ज्ञानेश्वर व शारदा देवीची चांदीच्या मूर्तीचा करंडक देणारे सारडा महाविद्यालय हे राज्यातील एकमेव महाविद्यालय असल्याचा अभिमान आम्हाला आहे.

स्पर्धेचे निमंत्रक प्रा.राधिका ऋषी यांनी स्वागत केले, निमंत्रक डॉ.अंकुश आवारे यांनी आभार मानले. प्रा. योगेश तवर यांनी सूत्रसंचालन केले.

# नगरमध्ये १९ ते २१ सप्टेंबर दरम्यान ‘गहना प्रिमिअम ज्वेलरी एक्झिबिशन’

## पुणे, मुंबई व सुरत येथील ज्वेलर्सचे खास कलेक्शन उपलब्ध



नगर – नगरमधील हॉटेल आयरिश येथे १९ ते २१ सप्टेंबर या कालावधीत गहना प्रिमिअम ज्वेलरी एक्झिबिशनचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.३० ते रात्री ८.३० यावेळेत प्रदर्शन व विक्री सर्वांसाठी खुली असेल. महाराष्ट्रातील नामांकित ब्रॅण्डच्या एक्लुझिव्ह ज्वेलरी एक्झिबिशनमध्ये असणार आहेत, अशी माहिती धर्मेश खेरगांवकर यांनी दिली.

मन खेरगांवकर यांनी सांगितले की, एक्झिबिशनमध्ये गुजरात सुरत येथील चारू ज्वेलर्स हा ब्रॅण्ड सहभागी होणार आहे. इन हाऊस ज्वेलरी आणि सर्वोत्कृष्ट डायमंड ज्वेलरी या ज्वेलरीचे वैशिष्ट्य आहे. नगरमधील प्रदर्शनात ते नववधूसांठीची आपली खास विवाहरंभ ज्वेलरी कलेक्शन सादर करणार आहेत. यातील प्रत्येक दागिना मनाला भुरळ घालणारा असेल.

प्रदर्शनात ३३ वर्षांची परंपरा असलेल्या मुंबईतील सोहम क्रिएशनच्या दागिन्यांची खास व्हरायटी उपलब्ध असणार आहे. यात डेली वेअर डिझाईन, नववधूचे सौंदर्य खुलवणारे खास दागिने आप्तस्वकीय, प्रियजनांना देण्यासाठी खास गिफ्ट आर्टिकल उपलब्ध असतील. पुण्यातील कियान सिल्व्हरची खास रेंज प्रदर्शनात ठेवण्यात येणार आहे. लेसर कट आणि अँटिक सिल्व्हर ज्वेलरी वुईथ रेडिएंट गोल्ड फिनिशिंग, सिल्व्हरच्या किंमतीत सोन्याच्या दागिन्यांची अनुभुती लाईट वेट मध्ये उपलब्ध आहेत.

पुणे येथे १९९६ पासून सुवर्ण सेवा देणारे मेहता ब्रदर्सही या प्रदर्शनात सहभागी होणार आहे. पुण्यात सोन्या मारुती चौक आणि भांडारकर रोडवर त्यांची शोरूम्स आहेत. ग्राहकांचे परिपूर्ण समाधान करणारी कलाकुसर असलेली ज्वेलरी त्यांचे वैशिष्ट्य आहे. २२ कॅरेट अँटिक फिनिशिंग ज्वेलरी, डायमंड (पोलकी ज्वेलरी) प्रदर्शनात ठेवण्यात येणार आहे.

आगामी नवरात्र, दसरा दिवाळी निमित्त सोन्याची मौल्यवान खरेदी केली जाते. अनेकदा नगरमधील ग्राहक पुणे, मुंबईतील प्रसिद्ध शोरूम मध्ये खरेदीसाठी जातात. गहना प्रिमिअम ज्वेलरी प्रदर्शनामुळे मोठ्या महानगरांतील शोरूम्स आपले खास कलेक्शन घेऊन नगर शहरात येत आहेत. या प्रदर्शनाला आवर्जून भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


बारामती येथे पार पडलेल्या ऑल इंडिया कराटे स्पर्धेत मुकुंदनगर उपनगरातील खेळाडूंनी यश मिळवले.

# ऑल इंडिया कराटे स्पर्धेत नगरच्या खेळाडूंचे यश; सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची केली कमाई

नगर – बारामती येथे पार पडलेल्या ऑल इंडिया कराटे स्पर्धेत नगर शहरातील मुकुंदनगरमधील खेळाडूंनी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य अशी पदके जिंकून अहिल्यानगरचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्वल केले. स्पर्धेत इब्राहीम शेख, हंझाला शेख, अली शेख व हुसेन शेख यांनी सुवर्णपदक पटकावले. तर अरसलान सय्यद, सफुरा शेख, महेक पठाण व आरिझ शेख यांनी रौप्य पदकाची कमाई केली.

कांस्यपदक विजेत्यांमध्ये झारा आंबेकर, दुआ शेख, हुसेन चौधरी, अर्शिया पठाण, अहमद शेख, अरीबा शेख, हफसा शेख, नश्रा इनामदार, राजिक शेख, सौद शेख, इरम खान, मुस्तफा शेख, युसुफ सय्यद, उमर शेख, हुजेर शेख, अब्दुल्ला सय्यद, अब्दुलरहमान सय्यद, झैद शेख, तमीम सय्यद, ऐमन शेख, अरकम सय्यद, तुबा पठाण, झारा शेख, इब्राहीम जावेद शेख, इंशा सय्यद, आरिझ सय्यद, मुशफिरा शेख, मुफिझ शेख, क्रिस्टीना सालवे, मोआझ शेख, युसरा सय्यद, ओम वाघ, नुरैन शेख आदींचा समावेश आहे.

या यशामागे कोच सबिल सर व साहिल सर यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली तर प्रशिक्षक सुजित हजारे, अजीम सय्यद व ओम वाघ यांनीही खेळाडूंना प्रशिक्षण दिले. स्पर्धेला शिहान मिनानाथ भोकरे, प्रणय शर्मा आदी उपस्थित होते.

# तप आराधना करणाऱ्या तपस्वींचा स्कायब्रिज परिवारातर्फे सन्मान

नगर – बुरुडगाव रोडवरील स्कायब्रिज गृहप्रकल्पातील रहिवाशांनी चातुर्मासात धर्माचरण केले. सिध्दी वृषभ बलदोटा यांच्या मासखमन तपस्येनिमित्त आनंदचालिसा पाठ कार्यक्रम घेण्यात आला. येथील किरण धर्मेंद्र बोरा यांनी वर्षीतप, अठाई तप, जयश्री अमृतलाल कोठारी यांनी दया तप केले. अमित लोढा, विजय गुंदेचा, रिना मुनोत यांनी तेला तप केले. २ भाविकांनी आयंबिल, १४ जणांनी एक उपवास, ४४ जणांनी एकासना तर ४ भाविकांनी बियासना केली. या सर्व तपस्वी भाविकांचा सन्मान करण्यात आला.


सिध्दी वृषभ बलदोटा यांच्या मासखमन तपस्येनिमित्त आनंदचालिसा पाठ कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी तपस्वी भाविकांचा सन्मान करण्यात आला

यावेळी स्वाती गुगळे, उषा लुणिया, अनिता मंत्री, संगिता चंगेडिया, प्रणीता कटारिया, किरण बोरा, लीना सिकची, रूचिता लोढा, रूतु लोढा, वैशाली मुनोत, प्रतिक्षा भंडारी, उल्का पारख, दीप्ती कटारिया, कला गुंदेचा, नेहा झंवर, प्रभा भळगट, सपना भळगट, रेखा मुथा, दीपिका मुथा, सुंदेचा छाया, पूजा बलदोटा, प्रतिभा बलदोटा, सुनिता बच्छावत, अंजली बलदोटा, सुरेखा बलदोटा, रीना मुनोत, गौतम पारख, विजय गुंदेचा, हिरालाल बलदोटा, सिध्दार्थ बलदोटा, ऋषभ बलदोटा, शुभम कटारिया, मनोज चंगेडिया, जितेंद्र गुगळे, सहर्ष लुणिया, अनिल लोढा, सिध्दार्थ लोढा, पुनिल भंडारी, संतोष मुनोत, आकाश मुनोत, राज बोरा, धर्मेंद्र बोरा, निहाल बोरा, गणेश झंवर, डॉ.दर्शन सिकची, स्वप्नील ओस्तवाल आदी उपस्थित होते.

सिध्दी बलदोटा म्हणाल्या, आनंद चालिसे निमित्त सर्व रहिवाशांनी पुन्हा एकत्र येण्याचा आनंद लुटला. सहपरिवार सर्व सण उत्सव एकत्रित साजरे केले जातात. रहिवाशी एकमेकांशी एकरूप झाले असून एक परिवारच याठिकाणी निर्माण झाला आहे. नुकताच येथे गणेशोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे या सर्व कार्यक्रमांसाठी महिलांचा पुढाकार व उत्साह असल्याचे पहायला मिळते.

सर्व तपस्वींचा सन्मान करून नव्या पिढीसमोर धर्माचरणाचा आदर्श निर्माण करण्यात आला. आता नवरात्र उत्सव साजरा करण्यात येणार असून यातील विविध कार्यक्रमांची जय्यत तयारी करण्यात येत आहे.

# भारताची विविधता दर्शविणाऱ्या माहितीपूर्ण फलकाचे ‘हिंद सेवा’च्या सीताराम सारडा विद्यालयात उद्घाटन

नगर – भारताची विविधता दर्शविणाऱ्या माहितीपूर्ण फलकाचे हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात उद्घाटन आमदार किशोर दराडे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी विद्यालयाबद्दल बोलताना आमदार किशोर दराडे यांनी हे विद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम राबवित असते. आधुनिक अध्यापनाच्या पद्धतीचा अवलंब करून विद्यार्थ्यांना सर्व गुणसंपन्न होण्यासाठी विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा, डॉ. पारस कोठारी माजी मुख्याध्यापक संजय मुद्गल यांच्यासह संपूर्ण शाला समिती, मुख्याध्यापक सौ. कानेटकर नंदा आणि शिक्षक नेहमी आग्रही असतात. त्यामुळेच विद्यालयाला आज एक उत्तम क्वालिटीचा प्रोजेक्टर मी भेट देत आहे, असे सांगितले. या उपक्रमाची माहिती मी महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये नक्की सांगेल असे... विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दराडे यांनी सांगितले.


भारताची विविधता दर्शविणाऱ्या माहितीपूर्ण फलकाचे हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात उद्घाटन आमदार किशोर दराडे यांच्या हस्ते करण्यात आले.

इयत्ता दहावी ब च्या विद्यार्थ्यांनी भारतातल्या उत्तराखंड या राज्याची सुंदर माहिती, चित्रे, सांस्कृतिक इतिहास, कला, क्रीडा, राजकीय क्षेत्रातील निवडक माहिती विद्यालयाच्या दर्शनी भागात कलात्मकरीत्या प्रदर्शित केली होती. विद्यार्थी आणि शिक्षक दीपक आरडे यांनी आमदार दराडे यांना माहिती दिली.

आमदार दराडे महाराष्ट्रात शिक्षकांसाठी संघर्ष करीत आहे. आम्ही आमदारांच्या पाठीशी पूर्वीही होतो आणि भविष्यात देखील राहू याचे अभिवचन अजित बोरा यांनी दिले. डॉ. पारस कोठारी यांनी हिंद सेवा मंडळाच्या विविध शैक्षणिक उपक्रमाची माहिती देतानाच येथील विद्यार्थी सक्षम असून त्यांना अभ्यासक्रमासोबत इतर क्षेत्रात देखील वाव मिळायला हवा. यासाठी हिंद सेवा मंडळ नेहमी प्रयत्नशील असते असे सांगितले.

यापसंगी हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेतील शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, सांगळे सर, ज्येष्ठ लेखनिक गोवर्धन पांडुळे, शिक्षक अशोक डोळसे, सुनील कुलकर्णी, संजय शेकडे, सौ. दिपाली लगड, सौ. सुजाता खामकर शिक्षक, पालक व विद्यार्थी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. नंदा कानिटकर यांनी केले. सूत्रसंचालन दीपक शिरसाट यांनी केले. वृषाली जोशी यांनी आभार मानले.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी सक्षम जाधव यांची नियुक्ती

नगर – राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी सक्षम राजेश जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर, माजी नगरसेवक विजय गव्हाळे, अभिजित खोसे, युवराज शिंदे, प्रा.माणिकराव विधाते, पै.ओंकार घोलप, पै.तुषार अरुण आदी उपस्थित होते.


राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी सक्षम राजेश जाधव यांची नियुक्ती होवून आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



आ. जगताप म्हणाले, समाज बदलासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. युवकांनी राजकारणासोबतच समाजकारणातही सक्रीय योगदान दिल्यास अनेक प्रश्न सुटू शकतात. या माध्यमातून युवा कार्यकर्त्यांना समाजकारणात काम करण्याची संधी मिळत असल्याचे सांगितले.

केतन क्षीरसागर यांनी सांगितले की, आज युवक विकासाकडे अपेक्षेने पाहत आहेत. नगर जिल्ह्याचे बदलते शहरी रूप युवकांच्या डोळ्यांसमोर आहे. आमदार जगताप यांच्या नेतृत्वामुळे मोठा युवा वर्ग राष्ट्रवादीशी जोडला गेला आहे. समाजकारणाची तळमळ व कार्यक्षमतेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पदाच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जात असल्याचे ते म्हणाले.

सक्षम जाधव यांच्या संघटन कौशल्याचा व युवकांमध्ये असलेल्या जनसंपर्काचा विचार करून ही जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. युवकांमध्ये सक्रिय सहभाग, सामाजिक कार्य करण्याची ओढ आणि प्रामाणिक तळमळीने जाधव काम करत आहे

# ‘गाता रहे मेरा दिल’ ग्रुपच्यावतीने कुमार यांच्या गीतांच्या म्युझिकल नाईट महफिलचे १९ सप्टेंबर रोजी आयोजन



नगर – गाता रहे मेरा दिल ग्रुपच्या वतीने हेमंत कुमार, किशोर कुमार, अमित कुमार, शब्बीर कुमार, कुमार सानू या गायकांचे गीतांची महफिल कुमार म्युझिकल नाईट १९ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ७ वाजता सर्जेपुरा येथील रहेमत सुलतान सभागृहात बडे अच्छे लगते है चे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजक ॲड. अमिन धाराणी यांनी सांगितले.

या गीतांच्या मैफिलीत नरेश पेवाल, गुलशन धाराणी, चारु ससाणे, दीपा भालेराव, संजय भिंगारदिवे, माधवी गुजर, डॉ. उमेश सुद्रिक, रज्ज़ाक शेख, पंढरीनाथ लांडगे, संतोष सूर्यवंशी, मुख्तार शेख, अमीन धारानी हे गीते सादर करणार असून माउथ ऑर्गनवर जीवन महाजन हे गीत सादर करतील अशी माहिती ॲड. गुलशन धाराणी यांनी दिली.

प्रवेश सर्वांना विनामूल्य असून कार्यक्रम वेळेवर सुरू होईल. या मैफिलीत नगरच्या संगीत रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आबिद खान यांनी केले आहे.

# सरस्वती विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय स्पर्धेत यश

## तायक्वांदो, वुशू व बॉक्सिंगमध्ये पदकांची कमाई, खेळाडूंची विभागीय पातळीवर स्पर्धेसाठी निवड

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका अंतर्गत झालेल्या शालेय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करून सुवर्णपदकासह पदकांची लयलूट केली. शहरातील वाडिया पार्क क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी तायक्वांदो, वुशू आणि बॉक्सिंगमध्ये चमकदार कामगिरी केली.



अहिल्यानगर महानगरपालिका अंतर्गत झालेल्या शालेय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करून सुवर्णपदकासह पदकांची लयलूट केली.

यामध्ये तायक्वांदो स्पर्धेत कु. प्रांजल पोटे (अंडर-१४) व चि. श्रीनिवास शिंदे (अंडर-१७) यांनी सुवर्णपदक आणि चि. यश मांढरे (अंडर-१७) व चि. संघराज तिखुटे (अंडर-१७) कांस्यपदक पटकाविले.

वुशू मध्ये चि. श्रीनिवास शिंदे (अंडर-१७) कांस्यपदक तर बॉक्सिंगमध्ये कु. जुबेर पठाण (अंडर-१७) यांनी सुवर्णपदक मिळवले. यापैकी सुवर्णपदक विजेत्यांची आगामी विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर व क्रीडाशिक्षक अविनाश साठे यांचे मार्गदर्शन लाभले.

# शिक्षणातून मिळणारे ज्ञान आणि उद्योजकतेतील धाडस यांचा संगम झाला तरच खरी प्रगती साधता येते : बाळासाहेब सागडे

नगर – विद्यार्थ्यांना उद्योजकतेकडे सकारात्मक दृष्टिकोन देत उद्योजक हा केवळ स्वतःसाठीच नव्हे तर समाजासाठीही रोजगार निर्माण करणारा असतो असे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब सागडे यांनी केले. तसेच शिक्षणातून मिळणारे ज्ञान आणि उद्योजकतेतील धाडस यांचा संगम झाला तरच खरी प्रगती साधता येते असा संदेश देत उपस्थितांना प्रेरित केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि द आसरा फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालय येथे १६ सप्टेंबर रोजी उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात विद्यार्थी, नवउद्योजक, आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये प्राचार्य बाळासाहेब सागडे, सहायक आयुक्त रवीकुमार पंतम, यशस्वी उद्योजक भाऊसाहेब जिंजरे, सर्टिफाईड गूगल ट्रेनर निखिल कुलकर्णी, स्टार्टअप कोच व कॉर्पोरेट ट्रेनर डॉ. विशाल भजुभळराव तसेच द आसरा फौंडेशनच्या कार्यक्रम अधिकारी श्रीमती नेहा ननावरे यांचा समावेश होता.

मेळाव्यातील उद्योजक कट्टा या सत्रात भाऊसाहेब जिंजरे यांनी स्वतःच्या संघर्षमय प्रवासाची कहाणी सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

सोशल मीडिया मार्केटिंग सत्रात निखिल कुलकर्णी यांनी व्यवसाय वृद्धीसाठी डिजिटल साधनांचा प्रभावी वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. विशाल भजुभळराव यांनी उद्योजकतेत चिकाटी, सकारात्मकता आणि नेतृत्वगुणांचे महत्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे व्यवस्थापन हे कॉलेजच्या ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून करण्यात आले. सूत्रसंचालन ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. आशिष वाणी यांनी केले. श्रीमती शुभदा पाठक यांनी आभार मानले.


न्यू आर्टस् महाविद्यालयात उद्योजक मेळाव्यात मार्गदर्शन करताना सहायक आयुक्त रवीकुमार पंतम.



# नेहरूंच्या बंगल्याची अकराशे कोटींना विक्री

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा बंगला अलिकडेच ११०० कोटी रुपयांना विकला गेला. हे भारतातील सर्वात मोठे प्रॉपर्टी डील मानले जात आहे. हा करार देशातील आतापर्यंतचा सर्वात महागडा मालमत्ता करार आहे. लुटियन्स असे या बंगल्याचे नाव आहे. लुटियन्स बंगला दिल्लीतील १७ मोतीलाल नेहरू मार्ग (पूर्वीचे यॉर्क रोड) येथे आहे. हा बंगला १४,९७३ चौरस मीटर म्हणजेच सुमारे ३.७ एकरमध्ये पसरलेला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू हे पंतप्रधानांचे पहिले होते. के त्यांचे अधिकृत निवासस्थान होते. हा बंगला १,४०० कोटी रुपयांना विक्रीसाठी ठेवण्यात आला होता. भारतीय पेय उद्योगाशी संबंधित एका मोठ्या व्यावसायिकाने सुमारे १,१०० कोटी रुपयांना हा बंगला खरेदी केला.

राजकुमारी कक्कर आणि बीना राणी या या बंगल्याच्या सध्याच्या मालक आहेत. दोघीही राजस्थानच्या एका राजघराण्यातील आहेत. सुमारे २४ हजार चौरस फूट जागेत बांधलेल्या या प्रचंड मालमत्तेची विक्री करण्यासाठी गेल्या वर्षभरापासून चर्चा सुरू होती.

नेमके स्थान, व्हीव्हीआयपी दर्जा आणि आकार लक्षात घेता ही एक अतिशय मौल्यवान मालमत्ता आहे; परंतु किमतीमुळे फक्त एक अब्जाधीश खरेदीदारच त्यात रस दाखवू शकला. ही मालमत्ता लुटियन्स बंगला झोनमध्ये आहे. ती १९१२ ते १९३० दरम्यान ब्रिटिश वास्तुविशारद एडविन लुटियन्स यांनी डिझाइन केली होती. सुमारे २८ चौरस किलोमीटरमध्ये पसरलेल्या या परिसरात सुमारे ३,००० बंगले आहेत, ज्यात बहुतेक मंत्री, न्यायाधीश आणि वरिष्ठ सरकारी अधिकारी राहतात. येथे सुमारे ६०० खासगी मालमत्ता आहेत, ज्या भारतातील सर्वात श्रीमंत लोकांच्या मालकीच्या आहेत. या कराराच्या पूर्ततेनंतर १७ मोतीलाल नेहरू मार्गावरील हा बंगला देशातील सर्वात महागड्या निवासी मालमत्तेच्या विक्रीचा एक नवा विक्रम प्रस्थापित करेल.

# भारतात होते डायनॉसॉरचे अस्तित्त्व

भारताच्या इतिहासात डोकावलं असता काही वैभवसंपन्न गोष्टी नजरेसमोर येतात आणि अनेकांच्या भुवया उंचावतात. याच भारतात डायनॉसॉरचं अस्तित्व होतं असं कोणी सांगितलं तर विश्वास बसणार नाही, मात्र हे सत्य आहे. आतापर्यंत 'ज्युरासिक पार्क' नावाच्या चित्रपटाच्या सीरिजमुळे डायनॉसॉरसारख्या महाकाय प्राण्याच्या अस्तित्वाविषयी अनेकांना माहिती मिळाली. अर्थात चित्रपटाच्या आधीपासून विविध संदर्भांमध्ये लिखित स्वरुपातही डायनॉसॉरची माहिती उपलब्ध आहे, हे नाकारता येत नाही; पण भारतात नुकत्याच झालेल्या संशोधनातून ही असामान्य बाब समोर आली आहे. भारतीय संशोधकांना साधारण मगर- डायनॉसॉरसारख्या आकाराच्या प्राण्याचे अवशेष सापडले आहेत. ज्युरासिक काळातील हे अवशेष राजस्थानच्या जैसलमैरमधील निर्मनुष्य भागात सापडले असून या संशोधनामुळे राजस्थानमधील या भागाबाबतची चर्चा एकाएकी वाढली आहे. संशोधकांच्या माहितीनुसार उत्खननातून समोर आलेले हे अवशेष फायटॉसॉरचे असून ते साधारण १.५ ते २ मीटर इतक्या आकाराचे आहेत. साधारण २०० मिलियन वर्षांपूर्वीचे हे अवशेष ज्युरासिक कालखंडाच्या सुरुवातीचे अवशेष असल्याची माहिती आहे. सेमी ॲक्वेटिक रेप्टाईल्स या श्रेणीत या प्राण्याची गणती होत असून, सध्याच्या मगरीचे ते पूर्वज असल्याचं म्हटलं जातं. जैसलम`रच्या मेघा गावातील एका पुरातन ठिकाणी हे अवशेष सापडले. तिथे असणाऱ्या या भौगोलिक रचना पाहता डायनासोरच्या कालखंडाम ध्ये इथे जीवसृष्टी अस्तित्वात असल्याचा दावा संशोधकांनी केला आहे. या संशोधनाचं नेतृत्त्वं डॉ. नारायणदास इन्खिया यांनी राजस्थानच्या पाणी खात्याशी समन्वय साधत केलं.



संशोधकांच्या मते या भागात अशी आणखी अनेक रहस्य दडलेली असू शकतात, जी समोर आणणं आव्हानात्मक काम आहे. दरम्यान, प्राथमिक स्वरुपात या अवशेषांची माहिती एका तलावाच्या उत्खननावेळी स्थानिक गावकऱ्यांना मिळाली. मातीत खोदकाम करत असताना साफल्यासम काही अवशेष दिसताच त्यांनी यासंदर्भातील माहिती संबंधित शासकीय विभागाला दिली. त्यानंतर आणखी खोदकाम केलं असता तिथे फायटॉसॉरचे अवशेष आणि कैक वर्षांपासून तिथंच राहिलेली या प्राण्याची जीवाश्म रुपातील अंडीसुद्धा सापडली. त्यामुळे इथे हा जीव नदीकाळी कैक वर्षांपूर्वी बऱ्याच काळासाठी वास्तव्यास असल्याच्या प्राथमिक निष्कर्षांवर संशोधक सध्या पोहोचले आहेत.

## कॅलिडोस्कोप



# अन्नदानाच्या निमित्ताने...

इटलीची राजधानी रोमचे रहिवासी डिनो इम्पेग्लिआजो ९२ वर्षांचे आहेत. गेल्या १५ वर्षांपासून ते अन्नादानाचं पुण्यकर्म करत आहेत. गरीबांचे शेफ अशीच त्यांची ओळख आहे. डिनो शहरातल्या गरीब आणि बेघर लोकांना जेवण देतात. आठवड्यातले तीन दिवस ते अन्नदान करतात. गरीबांना अन्नदान करण्यासाठी त्यांनी खास स्वयंपाकघर तयार केलं आहे. या कामासाठी त्यांनी एक टीम तयार केली आहे. हे जेवण शहरातल्या तीन रेल्वे स्थानकांलगतच्या गरीबांमध्ये तसंच शहरातल्या प्रसिद्ध सेंट पीटर्स स्क्वेअर परिसरात वाटलं जातं. या चांगल्या कामासाठी त्यांनी एक संस्था तयार केली आहे. या संस्थेत ३०० लोक काम करतात. हे लोक निधी गोळा करतात. या निधीचा वापर अन्नदानासाठी केला जातो. १५ वर्षांपूर्वी डिनो यांची एका गरजूशी भेट झाली होती. हा गरजू त्यांना रेल्वे स्थानकावरच भेटला होता. त्यानंतर त्यांना अशा प्रकारे अन्नदान करण्याची कल्पना सुचली. या गरजूने त्यांच्याकडे खाण्यासाठी पैसे मागितले होते. मग आपणच अशा असंख्य गरजूंना मदत करायला हवी, असं त्यांच्या मनात आलं आणि इथूनच त्यांच्या अन्नदानाच्या प्रवासाला सुरूवात झाली.

# अंबानी, अदानी, मस्कपेक्षाही श्रीमंत व्यक्ती!

अमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत; पण इतिहासाच्या पानांमध्ये अशा एका व्यक्तीची संपत्ती दडली आहे की त्याची तुलनाच होऊ शकत नाही. आजच्या सर्वात श्रीमंत लोकांपेक्षाही ही संपत्ती जास्त होती. त्या व्यक्तीच्या तुलनेत आजच्या काळातील श्रीमंत उद्योगपती अंबानी, अदानी, एलन मस्क हे कुठेच नाही. ही व्यक्ती म्हणजे चौदाव्या शतकातील आफ्रिकी सम्राट मनसा मुसा. ही व्यक्ती कदाचित आत्तापर्यंतची पृथ्वीवरील सर्वात श्रीमंत व्यक्ती असेल आणि त्याच्याइतकी संपत्ती कुणाकडेच नसावी.



मुसाचा जन्म १२८० मध्ये झाला. १३१२ मध्ये तो पश्चिम आफ्रिकेतील विशाल माली साम्राज्याच्या सिंहासनावर बसला. आजच्या मानकांनुसार मुसाच्या संपत्तीचा अंदाज लावल्यास त्याची किंमत ४०० अब्ज डॉलर्स इतकी भरेल. आजच्या काळातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेल्या जेफ बेझोस यांच्यापेक्षादेखील ही संपत्ती दुप्पट आहे. आजचे श्रीमंत लोकही संपत्तीच्या बाबतीत मुसा यांच्यापेक्षा खूप मागे पडतील. त्याची संपत्ती ही त्याच्या राज्यातील विपुल नैसर्गिक संसाधनांमधून निर्माण झाली. मालीमध्ये बांबुक, वांगारा, बुरे, गालाम आणि तघाझा या खाणींमधून सोने काढले जात असे. मुसाने आयव्हरी कोस्ट, सेनेगल, माली आणि बुर्किना फासोसह अनेक समकालीन आफ्रिकन देशांवर राज्य केले. टिंबक्टू ही मुसाची शाही राजधानी होती. असं म्हटलं जातं, की तो त्याच्याकडे मदत मागणाऱ्यांना भरभरून सोनं देत असे. त्याने घेतलेल्या अनेक निर्णयांचे इतिहासात कौतुक केले जाते.

या सम्राटाकडे नैसर्गिक संसाधनांसह मोठ्या जमिनी होत्या. १३२४ मध्ये मनसा मुसा हे हज यात्रेसाठी मक्काला गेले होते. या प्रवासामुळे त्यांचे नाव इतिहासातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून अजूनही नोंदवले जाते. हजसाठी जाणारा त्यांचा कारवा सहारा वाळवंट ओलांडणारा आतापर्यंतचा सर्वात मोठा ताफा होता. या अहवालात दावा करण्यात आला आहे की मनसा मुसा सोनं लादलेले १०० उंट, १२००० नोकर आणि ६० हजार गुलाम यांच्या ताफ्यासह सौदी अरेबियातील मक्का येथे प्रवासाला निघाला होता. इतिहासकारांचा अंदाज आहे की या प्रवासात मुसाने १८ टन सोने वाहून नेले होते. सध्याच्या भावानुसार, त्याची किंमत सुमारे एक अब्ज डॉलर्सच्या आसपास आहे. इतिहासातील सर्वात श्रीमंत राजा म्हणून मानसा मुसाचे नाव घेतले जाते. मुसाच्या संपत्ती आणि उदारतेच्या इतक्या कथा आहेत, की आजचे अब्जाधीश त्याच्यासमोर खूपच मागे पडतील.



# सॅलामँडरची अजब दुनिया

या पृथ्वीतलावर असंख्य सजीव आहेत. प्रत्येक सजीवाचं एक वैशिष्ट्य आहे. काही सजीव पाण्याशिवाय बराच काळ जिवंत राहू शकतात तर काहींना अन्नाशिवायही दिवस काढता येतात. असाच एक सजीव काही न खाता बराच काळ जिवंत राहू शकतो. सॅलामँडर असं या सजीवाचं नाव. हा जीव बोस्निया आणि हर्जेगोविना इथल्या गुहांमध्ये सापडला आहे. गेल्या सात वर्षांपासून हा सॅलामँडर जागेवरून हललेला नाही. सॅलामँडर जवळपास १०० वर्षं जगतो. आपल्या जीवनातला बराच काळ तो पाण्यात घालवतो. स्लोवेनियापासून क्रोएशियापर्यंतच्या प्रदेशात हे प्राणी आढळतात. सॅलामँडर साधारण १२ वर्षांनंतर आपली जागा बदलतात. जोडीदाराच्या शोधासाठी त्याला हालचाल करावी लागते. दुर्गम भागातल्या गुहांमध्ये राहणाऱ्या सॅलामँडरना अन्न मिळतंच असं नाही. त्यामुळे ते बराच काळपर्यंत अन्नाशिवाय राहू शकतात. अशा या सॅलामँडरची दुनिया अजबच म्हटली पाहिजे.

# वाढवा जन्मदर

भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण होतात. मात्र बरेच युरोपियन देश कमी होणाऱ्या लोकसंख्येमुळे चिंतित आहेत. इकडे भारत, चीनसारख्या देशांना वाढती लोकसंख्या सतावत आहे. तिकडे युरोपमध्ये बरेच देश आपल्या नागरिकांना लोकसंख्या वाढवण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. ग्रीस हा सुद्धा असाच एक देश. इथे येत्या ३० वर्षांमध्ये लोकसंख्येत ३३ टक्के घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. ग्रीससह फिनलँड, सायप्रस, स्पेन आणि इटली या देशांनाही कमी होत जाणाऱ्या लोकसंख्येने चिंतेत टाकलं आहे. ग्रीसमध्ये महिलांना किंवा जोडप्यांना बाळाला जन्म द्यायला प्रोत्साहन देण्यासाठी बेबी बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रीस सरकारने बेबी बोनससाठी १८०० लाख युरो म्हणजे १४०० कोटी रुपये निधी बाजूला ठेवला आहे.



देशातला जन्मदर वाढवण्यासाठी जोडप्याला दोन हजार युरो म्हणजे जवळपास दीड लाख रुपये बोनस दिला जाईल. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार ग्रीसची सध्याची लोकसंख्या १.७ कोटी आहे. या देशातल्या जन्मदरात वाढ झाली नाही तर पुढच्या ३० वर्षांमध्ये ग्रीसची लोकसंख्या ३३ टक्क्यांनी घटेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. म्हणूनच ग्रीसने तातडीने उपाययोजना केल्या आहेत.

# सगळेच कुंभकर्ण!

बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांना निद्रानाशाचा त्रास होऊ लागला आहे. अपुऱ्या झोपेमुळे बराच त्रास होऊ शकतो. मात्र काही लोक कधीही झोपून जातात. त्यांना उभ्या उभ्याही झोप येते. काहीजण बोलता बोलता किंवा चालता चालता झोपून जातात. आता बोलता बोलता झोप लागू शकते पण चालताना कशी बरं झोप येईल? कझाकिस्तानमधल्या कलाची गावामधले लोक कधीही झोपतात. विशेष म्हणजे त्यांच्या झोपेचं गुपित अजूनही उघड झालेलं नाही. इथले लोक एकदा झोपल्यावर काही महिने उठतच नाहीत. झोपून उठल्यानंतर त्यांच्या काहीच लक्षात रहात नाही. तसंच ते काही तरी असंबद्ध बोलत राहतात. कलाची गावचं हे प्रकरण २०१० मध्ये समोर आलं होतं. त्यावेळी शाळेत गेलेली काही मुलं अचानक झोपी गेली. त्यानंतर बराच काळ ती उठलीच नाहीत. त्यानंतर अशा प्रकारे झोपणाऱ्यांची संख्या वाढत गेली. यानंतर शास्त्रज्ञांनी या भागात संशोधन सुरू केलं. मात्र नेमकं कारण सापडलं नाही. या भागात युरेनियमच्या खाणी आहेत. या खाणींमधून निघालेल्या वायूमुळे झोप येत असल्याचं स्थानिकांचं म्हणणं आहे. पण याला कोणताही शास्त्रीय आधार नाही. याच कारणामुळे इथले लोक दुसरीकडे स्थलांतरित होत आहेत.





# मोठा स्टील उत्पादक; तरी नेलकटरची आयात!

भारत हा मोठा स्टील उत्पादक आहे. असं असूनही नेलकटरसारखी लहानशी वस्तू बनवत नाही. 'वोल्झा' या ग्लोबल ट्रेड प्लॅटफॉर्मच्या आकडेवारीनुसार ऑक्टोबर २०२३ ते सप्टेंबर २०२४ दरम्यान भारताने चीनकडून तब्बल २३,९०० पेक्षा जास्त नेलकटरच्या खेप आयात केल्या. उरलेल्या काही खेप हाँगकाँग आणि दक्षिण कोरियातून आल्या.

एका नेलकटरची आयात किंमत (मालवाहतूक, कर व पॅकेजिंग धरून) सरासरी ०.४१ डॉलर इतकी होती. भारतात सध्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारा कुठलाही संघटित ब्रँड किंवा निर्माता नाही. फक्त काही छोटे, अनब्रँडेड युनिट्सच बाजारात कार्यरत आहेत. नेलकटर वाटते तेवढे साधे नसतात. ते तीक्ष्णपणा, गंजरोधक क्षमता आणि सततचा दबाव सहन करू शकतील, अशा अशा स्टेनलेस स्टीलपासून तयार होतात. चीनने यासाठी वर्षानुवर्षे मजबूत सप्लाय चेन व उत्पादन प्रणाली उभी केली आहे. कमी मजुरी, स्वस्त कच्चा माल आणि सरकारी सबसिडीमुळे ते जगातल्या बाजारावर वर्चस्व राखत आहेत. यासाठी खास मशीनरी, साचे आणि मेटलर्जी लागते. ती भारतात अजूनही मर्यादित आहे.

भारत स्टीलचा जगातील दुसरा सर्वात मोठा उत्पादक असूनही येथील उत्पादनाचा मोठा हिस्सा बांधकाम, पायाभूत सुविधा आणि ऑटोमोबाईल क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या कमॉडिटी-ग्रेड स्टीलवर आधारित आहे. नेलकटर, सर्जिकल उपकरणे आणि ब्लेडसाठी आवश्यक असलेल्या टूल-ग्रेड स्टेनलेस स्टीलचे उत्पादन मात्र अल्प प्रमाणातच होते. भारतामध्ये मेरठ, लुधियाना, जालंधर आणि राजकोटसारख्या ठिकाणी छोटे उद्योग नेलकटर तयार करतात; पण त्यांची संख्या कमी, एलॉयची गुणवत्ता मर्यादित आणि ब्रँडिंग जवळजवळ शून्य आहे. परिणामी, ही प्रॉडक्ट्स मोठ्या रिटेल किंवा ई-कॉमर्स मार्केटमध्ये स्पर्धा करू शकत नाहीत. वेगासारखे काही भारतीय ब्रँड बाजारात नेल कटर विकतात; मात्र त्यापैकी बहुतांश चीनमध्ये बनवलेले असून भारतात फक्त ब्रँडिंग करून विकले जातात. चीन हा जगातील सर्वात मोठा नेलकटर निर्माता आणि निर्यातदार आहे. अत्याधुनिक ऑटोमेटेड कारखान्यांमधून प्रचंड प्रमाणात उत्पादन केल्यामुळे त्यांना किंमत आणि प्रमाण या दोन्ही बाबतीत फायदा होतो. दक्षिण कोरिया तुलनेने लहान हिस्सा राखतो; पण उच्च-गुणवत्तेच्या ग्रूमिंग आणि प्रीमियम पर्सनल केअर टूल्ससाठी ओळखला जातो.

# टीव्हीवरची पहिली जाहिरात कधी आणि कोणती?

आज आपण दूरदर्शन आणि इतर माध्यमांवर अनेक प्रकारच्या जाहिराती पाहतो; पण भारतातील पहिली टेलिव्हिजन जाहिरात कोणती होती आणि ती कधी प्रसारित झाली, याची माहिती फारच थोड्या लोकांना असेल. आजकाल टीव्हीची जागा इंटरनेटवरील सेवांनी घेतली आहे, पण जाहिरातींचे महत्त्व आजही कायम आहे. भारतात टीव्हीवरील पहिली जाहिरात १ जानेवारी १९७६ रोजी प्रसारित झाली होती. ही जाहिरात ग्वाल्हेर शूटिंग अँड फॅब्रिक्स या कपड्यांच्या कंपनीची होती. या जाहिरातीनंतर भारतीय प्रसारमाध्यमांमध्ये जाहिरातींचे युग सुरू झाले. या जाहिरातींचा उद्देश केवळ वस्तू विकणे नसून, लोकांच्या जीवनशैलीत बदल घडवून आणणे हा होता. तेव्हापासून जाहिरातींची मागणी वाढतच गेली आणि ती प्रसारमाध्यम ांसाठी उत्पन्नाचे एक मोठे साधन बनली.

जाहिराती बनवण्यामागे मुख्य कारण म्हणजे ग्राहकांमध्ये उत्पादनाबद्दल जागरूकता निर्माण करणे. वेगवेगळ्या माध्यम ांद्वारे जाहिराती प्रसारित केल्या जातात. यामुळे लोकांना वस्तू आणि सेवांबद्दल माहिती मिळते. तसेच, ज्या माध्यमावर जाहिरात प्रसारित होते, त्या संस्थेला त्यातून उत्पन्न मिळते.



जाहिरात कंपन्या आपल्या उत्पादनाच्या प्रसिद्धीसाठी पैसे देतात आणि त्यातून घरोघरी त्यांच्या वस्तूंची माहिती पोहोचवतात.

भारतात रंगीत टीव्हीची सुरुवात १९८२ मध्ये झाली. टीव्हीवर आशियाई खेळांचे प्रक्षेपण सुरू झाल्यावर भारतीय टेलिव्हिजनमध्ये मोठी क्रांती झाली. टीव्हीचे रंगीत जग आल्यावर 'बुनियाद', 'नुक्कड', 'रामायण' आणि 'महाभारत' यासारख्या कार्यक्रमांनी टीव्हीची लोकप्रियता शिखरावर पोहोचवली. या जाहिरातींनी सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांनाही चालना दिली.१९९० च्या दशकानंतर जाहिरातींचे स्वरूप बदलले. खासगी वाहिन्यांच्या आगमनाने जाहिरातींमध्ये स्पर्धा वाढली. त्यामुळे जाहिराती अधिक आकर्षक आणि व्यावसायिक झाल्या. आजही टीव्ही, इंटरनेट आणि सोशल मीडियावर जाहिरातींचा प्रभाव कायम आहे.

# तातडीने पंचनामे करून मदत उपलब्ध करून द्या : विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे

नगर – अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या कर्जत तालुक्यातील नागलवाडी, नागपूर, सितपूर, निंबोडी, तरडगाव, मलठण व जामखेड तालुक्यातील चौंडी या गावांना विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन नुकसानीचा सविस्तर आढावा घेतला. ग्रामस्थांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

मुसळधार पावसामुळे शेती, चारा, जनावरांचे गोठे, रस्ते, पूल, बंधारे व पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर बाधित झाल्या आहेत. जिल्हा परिषद शाळांवर व घरांवरील छप्पर उडून गेल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण तसेच ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. चौंडी येथील शिल्पसृष्टीच्या बुरुजाला पाणी लागले असून चौंडी पुलावर ७ ते ८ फूट पाणी आल्याचेही या पाहणीत निदर्शनास आले.

या पार्श्वभूमीवर महसूल, कृषी व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना दोन दिवसांत पंचनामे करून अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत शासनाकडे सादर करण्याचे निर्देश सभापतींनी दिले. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी, प्रभावित कुटुंबांना अन्न, पाणी व वैद्यकीय मदत उपलब्ध व्हावी तसेच पायाभूत सुविधांची दुरुस्ती व पुनर्बांधणी तातडीने सुरू करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.




अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या कर्जत तालुक्यातील नागलवाडी, नागपूर, सितपूर, निंबोडी, तरडगाव, मलठण व जामखेड तालुक्यातील चौंडी या गावांना विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन नुकसानीचा सविस्तर आढावा घेतला.

ग्रामस्थांना संवाद साधताना प्रा. शिंदे म्हणाले, ही आपत्ती ग्रामस्थांना एकट्याने लढायची नाही. शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून एकही शेतकरी वा ग्रामस्थ मदतीपासून वंचित राहणार नाही. शासनस्तरावर आवश्यक ती मदत मिळविण्यासाठी मी स्वतः पाठपुरावा करणार आहे.

ग्रामस्थांनी संयम राखावा, एकमेकांना सहकार्य करावे व प्रशासनाशी समन्वय ठेवून परिस्थितीचा सामना करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या प्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपविभागीय अधिकारी नितीन पाटील यांच्यासह महसूल, कृषी, वन व जलसंधारण विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तसेच कर्जत व जामखेड तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ सहभागी झाले होते.



पाथर्डी तालुक्यातील आपत्तीग्रस्त भागाची पाहणी करून आपत्तीग्रस्तांना दिलासा देताना खा. नीलेश लंके व माजी मंत्री प्राजक्त तनपुरे.

# जिल्ह्यातील आपत्तीग्रस्तांना तात्काळ मदत द्या, खा. नीलेश लंके यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

## माजी मंत्री प्राजक्त तनपुरेंसोबत पाहणी करत आपत्तीग्रस्तांना किराणा किटचे वाटप

नगर – लोकांनी आयुष्यभराच्या कष्टाने उभे केलेले संसार एका रात्रीत उध्वस्त झाले आहेत. पंचनाम्यांची प्रक्रिया सुरू झाली तरी लोकांना आता मदतीची गरज आहे. कागदी अहवाल तयार होईपर्यंत लोक उपाशी राहणार का ? शासनाने तात्काळ आर्थिक मदत व साहित्याची मदत करावी. वाळकी परिसरातील आपत्तीप्रमाणे फक्त नोंदी करून काम संपवू नका असे सुनावत खा. नीलेश लंके यांनी आपत्तीग्रस्तांना तात्काळ मदतीची आवश्यकता असल्याचे सांगितले.

तिसगांव परिसरात दोन दिवसांत कोसळलेल्या मुसळधार पावसाने कहर केला. परतीच्या या पावसामुळे नद्या–नाल्यांना पूर आला. रस्ते वाहून गेले. पाण्याच्या प्रवाहात घरे पाण्यात वाहून गेली. शेतजमीनीवरील पिके संपूर्णपणे नष्ट झाली. आपत्तीग्रस्त भागाची पाहणी करून मदत देण्यासाठी खा. नीलेश लंके यांनी १६ सप्टेंबर रोजी सकाळीच तिसगांव तसेच इतर आपत्तीग्रस्त भागाकडे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्यासह धाव घेतली. आपत्तीग्रस्त कुटूंबांची घरे, शेतजमिनी, वाहून गेलेले रस्ते यांची पाहणी त्यांनी करत त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला.

अतिवृष्टीमुळे या भागातील नागरिक उध्वस्त झाले आहेत. लोकांनी पन्नास, पन्नास वर्षे कष्टाने उभे केलेले एका रात्रीत उध्वस्त झाले. नुकसानीने पंचनामे झालेच पाहिजेत कारण त्याशिवाय किती नुकसान झाले हे समजणार नाही. पंचनामे झाल्यानंतर बाधितांना तात्काळ मदत मिळाली पाहिजे. पंचनामे होतील मात्र सध्या आपत्तीग्रस्तांना तात्काळ मदतीचे अपेक्षा असून प्रशासनाने त्यांनी ती करावी अशी आमची मागणी आहे.

### मदतीचा हात देण्याची आमची भूमिका

आपत्तीग्रस्त भागाची पाहणी करताना, आपत्तीग्रस्तांशी संवाद साधताना आपण त्यांना काहीतरी मदतीचा हात दिला पाहिजे अशी आमची नेहमीच भूमिका असते. त्याप्रमाणे या भागातही आम्ही आपत्तीग्रस्तांच्या भेटीप्रसंगी किरणा किटचे वाटप करत आहोत. असे खा. नीलेश लंके यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

### निकष दूर ठेऊन मदत द्या

इतक्या मोठया प्रमाणावर अतिवृष्टी या भागात आजवर कधी झाली नव्हती. एनडीआरएफच्या निकषानुसार मिळणारी मदत ही तुटपुंजी असते. येथे लोकांचा संपूर्ण प्रपंच कोसळला आहे. शासनाने हे निकष बाजूला ठेऊन विशेष आर्थिक पॅकेज द्यावे. घरे, रस्ते, पिके सर्वकाही नष्ट झाले आहे. फक्त पिक विमा किंवा सापेक्ष मदत अपुरी ठरेल. नद्यांच्या पात्रातील अतिक्रमणामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह रोखला जातो आणि पुरस्थिती गंभीर बनते त्यासाठी अतिक्रमणेही हटविणे गरजेचे आहे असे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे म्हणाले.

# अहिल्यानगर महानगरपालिका २ ऑक्टोबरपर्यंत राबविणार 'स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान'

## महिलांसाठी आरोग्य तपासण्या, आरोग्य सुविधा व उपक्रमांचे आयोजन; नागरिकांच्या सहभागातून अभियान राबवणार : आयुक्त यशवंत डांगे

नगर – केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या निर्देशानुसार राज्य शासनाच्या आरोग्य विभाग व महानगरपालिकेच्या वतीने अहिल्यानगर शहरात स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे. अभियानांतर्गत ११ आरोग्य केंद्रांवर महिलांसाठी विविध आरोग्य तपासणी शिबिर, जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत या शिबिर व उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. यात महिलांसाठी रक्तदाब, मधुमेह, नेत्र, दंत रोग तपासणी, स्तन व गर्भाशय मुख व मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण सेवा, रक्त व हिमोग्लोबिन तपासणी, क्षयरोग तपासणी, सिकसेल आजार व रक्तक्षय तपासणी आदी तपासण्या करून विशेष तज्ज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच, स्थानिक व क्षेत्रीय आहाराला प्रोत्साहन देणे, गरोदर आणि स्तनदा मातांसाठी तसेच लहान बाळांसाठी योग्य आहार, मासिक पाळी स्वच्छता व पोषण, टेक–होम राशन (THR) चे वितरण आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. माता व बालसुरक्षा (एमसीपी) कार्ड, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना नोंदणी, आयुष्मान वय वंदना कार्ड, सिकल सेल कार्ड, पोषण ट्रॅकरमध्ये लाभार्थी नोंदणी आदी सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत

या अभियानात नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी जनजागृती उपक्रम, तसेच रक्तदान शिबीर, निक्षय मित्र, स्वयंसेवक नोंदणी, अवयवदान नोंदणी आदी उपक्रमही घेतले जाणार आहेत. नागरिकांनी या सेवा व सुविधांचा लाभ घेऊन अभियानात सहभागी व्हावे, अधिक माहितीसाठी जवळच्या मनपा आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

१८ सप्टेंबर रोजी बाळासाहेब देशपांडे रुग्णालय, १९ सप्टेंबर रोजी जिजामाता आरोग्य केंद्र व बूथ हॉस्पिटल, २० सप्टेंबर रोजी सिद्धार्थनगर आरोग्यवर्धिनी केंद्र, २३ सप्टेंबर रोजी महात्मा फुले आरोग्य केंद्र, श्रमिकनगर बालाजी मंदिर सिव्हिल नागरी आरोग्य केंद्र, २४ सप्टेंबर रोजी मुकुंदनगर आरोग्य केंद्र, २५ सप्टेंबर रोजी सारसनगर आरोग्यवर्धिनी केंद्र, २६ सप्टेंबर रोजी भूषणनगर केडगाव आरोग्य केंद्र, २७ सप्टेंबर रोजी हिम्मतनगर आरोग्यवर्धीनी केंद्र, २९ सप्टेंबर रोजी शिवाजीनगर आरोग्यवर्धिनी केंद्र, ३० सप्टेंबर रोजी तोफखाना आरोग्य केंद्र व १ ऑक्टोबर रोजी नागापूर आरोग्य केंद्र येथे शिबिर व उपक्रम होणार आहेत.



गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना स्थायी समितीचे माजी सभापती गणेश कवडे आदी.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

नगर – शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट गुण मिळवून यश मिळविलेल्या मुला– मुलींचा महापालिकेचे स्थायी समितीचे माजी सभापती गणेश कवडे यांनी सत्कार केला.

श्री. कवडे हा उपक्रम दरवर्षी राबवत आहेत व मुलांच्या शिक्षणासाठी हातभार लावत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेजर सुनील कवडे यांनी केले व इंजि. राजेंद्र भिसे यांनी आभार मानले. माजी नगराध्यक्ष कै. सुरेश छबूराव शेळके यांच्या भगिनी सौ. जनाबाई खंडेराव कवडे यांनी सर्व मुलांना व मुलींना आशिर्वाद देवून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण आणि पर्यावरण संरक्षणासाठी २२ सप्टेंबरपासून आमरण उपोषण



नगर – विद्यार्थ्यांना शिक्षण व उच्चशिक्षण कायमस्वरूपी मोफत मिळावे आणि पर्यावरण संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याच्या मागणीसाठी गोरक्षनाथ विश्वनाथ गवते यांनी २२ सप्टेंबरपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. हे उपोषण राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील पाचीमहादेव मंदिर परिसरात होणार असून, प्रशासनाने दखल घेतली नाही तर आत्मदहनाचा इशाराही गवते यांनी दिला आहे.

गोरक्षनाथ गवते हे २०११ पासून पर्यावरण रक्षक उपक्रम राबवीत आहेत. त्यांच्या उपक्रमांतर्गत एक विद्यार्थी एक झाड, एक व्यक्ती एक झाड या मोहिमेबरोबरच कुऱ्हाडबंदी, डी.जे. बंदी, हुंडाबंदी, व्यसनबंदी, प्लास्टिकबंदी, शिकारबंदी, खाजगी सावकारकी बंदी, भ्रष्टाचारबंदी अशा अनेक

**न्याय मिळाला नाही तर उपोषण स्थळापासून अंत्ययात्रा निघेल : गोरक्षनाथ गवते**

उपक्रमांचा समावेश आहे. तसेच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव, घर तेथे शौचालय, विषमुक्त शेती, रोगमुक्त भारत, पाणी आडवा पाणी जिरवा, बेटी बचाव–बेटी पढाव यासारखे अभियानही त्यांनी राबवले आहेत.

गवते म्हणाले की, जिल्हा परिषदेपासून महाविद्यालयांपर्यंत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी प्रेम आणि जिव्हाळा निर्माण करणे हेच त्यांचे ध्येय आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा पर्यावरण रक्षक नागरिक होईल, अशी जाणीव शाळा–कॉलेजच्या माध्यमातून रुजविणे गरजेचे आहे. स्वच्छ, सुंदर, निरोगी व बलशाली भारत घडविण्यासाठीच हे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पर्यावरण रक्षण आणि मोफत शिक्षण या मागण्यांसाठी गवते यांनी यापूर्वीही अनेक उपोषण व आंदोलन केले आहे. आत्मदहनाचा इशारा देऊन देखील मात्र अद्याप प्रशासनाने उपाययोजना केल्या नाहीत. त्यामुळे २२ सप्टेंबरपासूनचे उपोषण सुरू ठेवले जाईल याबाबत निर्णय न घेतल्यास उपोषण मागे घेतले जाणार नाही, असे गवते यांनी स्पष्ट केले.

याबाबत त्यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, मागण्या मान्य न झाल्यास २२ सप्टेंबरपासून सुरू होणारे उपोषण हे शेवटच्या श्वासापर्यंत असेल परिवर्तित होईल. या लढाईत पर्यावरणास न्याय मिळाला नाही अखंड भारतातील विद्यार्थ्यांना शिक्षण उच्च शिक्षण मोफत मिळाले नाही तर माझीच वांबोरीतून अंत्ययात्रा निघेल, असे ते म्हणाले. या आंदोलनात पर्यावरण प्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षांचे नेते तसेच जनतेने सहभागी होऊन या लढ्याला पाठिंबा द्यावा, असे आवाहन गवते यांनी केले आहे.

# माऊंट आबू येथील राष्ट्रीय मीडिया महासंमेलनाचे ना.राम शिंदे यांचे हस्ते २७ सप्टेंबर रोजी उद्‌घाटन

आबू रोड (राजस्थान) – प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय माऊंट आबू येथील शांतिवन कॅम्पस येथे मीडिया विंगच्या सौजन्याने २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान राष्ट्रीय मीडिया महासम्मेलन आयोजित करण्यात आले आहे. याचे उद्घाटन विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते २७ सप्टेंबरला सकाळी १०:३० ला होणार आहे. समन्वयक डॉ. दीपक हरके यांनी माहिती दिली. यावेळी राम शिंदे यांना ध्यानधारणेचे पुस्तक भेट दिले.

समाजात शांती, एकता आणि विश्वास प्रस्थापित करण्यासाठी माध्यमांची भूमिका हा या वर्षीच्या महासम्मेलनाचा विषय आहे. या परिषदेत देशभरातून माध्यम क्षेत्राशी संबंधित विविध प्रतिनिधीं सहभागी होणार आहेत. त्यामध्ये वृत्तपत्र व मासिकांचे मालक, प्रकाशक, संपादक व संवाददाता, रेडिओ व टीव्ही चॅनेल्सचे सीईओ, डायरेक्टर, कार्यक्रम अधिकारी व पत्रकार, माहिती मंत्रालयाचे अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, न्यूज एजन्सीचे प्रतिनिधी, मीडिया प्राध्यापक व विद्यार्थी, लेखक, स्क्रिप्ट रायटर, चित्रपट निर्माता, छायाचित्रकार, व्हिडिओग्राफर, सोशल मीडिया तज्ज्ञ, पब्लिकेशन व प्रिंटिंग प्रेस प्रतिनिधी, चित्रपटगृह संचालक, केबल ऑपरेटर तसेच टपाल विभागाचे अधिकारी यांचा समावेश आहे.

या महासम्मेलनात अंदाजे १५०० मीडियाकर्मी सहभागी होणार आहेत. परिषदेत सहभागी होण्यासाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. यासाठी कुठलेही शुल्क आकारले जाणार नाही. भोजन व निवासाची व्यवस्था नि:शुल्क करण्यात येणार आहे. नोंदणीसाठी मोबाईल क्रमांक ९१२२२८८८८८ वर संपर्क साधावा



विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांना ध्यानधारणेचे पुस्तक भेट देताना डॉ. दीपक हरके.

# शिक्षक हा समाजाचा पाया : रमाकांत काठमोरे

## रायझिंग ट्रायबल फाउंडेशन व स्वाभिमानी शिक्षक संघटनेतर्फे शिक्षकांचा गौरव

नगर – शिक्षक हा समाजाचा पाया आहे. समाज घडविण्याचे कार्य शिक्षक करत असून, भावी पिढीच्या भवितव्यासाठी त्यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. विद्यार्थी घडविणे हेच शिक्षकाचे ध्येय असावे. असे रमाकांत काठमोरे यांनी सांगितले. तर शिक्षण क्षेत्रात सुरु असलेल्या शिंदे यांच्या कार्याचे कौतुक केले.

येथील रायझिंग ट्रायबल फाउंडेशन व महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी शिक्षक संघटनेच्या वतीने गुणवंत शिक्षकांचा राज्यस्तरीय गौरव सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात तब्बल ३७ शिक्षकांना राज्यस्तरीय शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे शिक्षण सहसंचालक रमाकांत काठमोरे, माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर, मनपा शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण आणि माजी नगरसेवक योगीराज गाडे यांच्या हस्ते शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते.

प्रास्ताविकात शिंदे यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य सतत सुरू आहे. त्याचबरोबर शिक्षकांचे विविध प्रश्न सोडवून त्यांचा सन्मान वाढविण्याचे कार्य सुरु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दिनकर टेमकर यांनी शिक्षक–विद्यार्थी यांचे नाते आजही कायम आहे. आजी–माजी विद्यार्थ्यांकडून शिक्षकांना सन्मान दिला जातो. विद्यार्थ्यांना दिशा देण्याचे काम ते करतात. अशैक्षणिक कामांच्या भारातही शिक्षक प्रामाणिकपणे काम करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जुबेर पठाण यांनी शिक्षकांना शुभेच्छा देत फाउंडेशनच्या उपक्रमांचे कौतुक केले.

योगीराज गाडे म्हणाले, शिक्षक अल्प वेतनातसुद्धा प्रामाणिकपणे काम करतात. त्यांचा सन्मान होतोय ही आनंदाची बाब आहे. प्रत्येक क्षेत्रात पुढे गेलेल्या विद्यार्थ्यांच्या मागे पालकांसह शिक्षकांचे योगदान असल्याचे ते म्हणाले.

या प्रसंगी डॉ.अर्शद सय्यद, शिक्षक रवींद्र गावडे, बाळासाहेब वाकचौरे यांच्यासह अनेकांनी शिक्षकांचे समाजातील महत्त्व विशद करुन गुणवंत शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी बंडू गाडेकर, राजेंद्र सोनवणे, अमोल क्षीरसागर, बाबासाहेब गवते, अंतोन मिसाळ, अनिता साठे, रिबिका क्षेत्रे, मुन्नवर खान, नियाज शेख, प्रमोद जाधव, महेंद्र तागड, देवराम दरेकर, प्रवीण साळवे, विजय साळवे, रवी चांदेकर, किशोर कार्ले आदींनी परिश्रम घेतले.



रायझिंग ट्रायबल फाउंडेशन व महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी शिक्षक संघटनेच्या वतीने गुणवंत शिक्षकांचा राज्यस्तरीय गौरव सोहळा पार पडला.

# 'इतिहास महाराष्ट्राचा' महाअंतिम फेरीत ध्वज मुनोत व अनुष्का साठे विजेते

नगर – बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के सामंत यांच्या संकल्पनेतून बालरंगभूमी परिषदेने 'इतिहास महाराष्ट्राचा : श्री शिवजन्मोत्सव ते श्री शिवराज्याभिषेक' या उपक्रमाचे आयोजन केले होते. राज्यभरात २६ ठिकाणी झालेल्या प्राथमिक फेरीतील सात हजारांहून अधिक बालकलावंतामधून निवडलेल्या प्रथम क्रमांक विजेत्यांची महाअंतिम फेरी १३ व १४ सप्टेंबर रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल मुंबई येथे झाली.

अंतिम फेरीत अहिल्यानगरचे प्रतिनिधित्व पि. म. श्री छावणी परिषद शाळा, आराधना गायकवाड, ध्वज मुनोत व अनुष्का साठे यांनी केले. सांघिक ५६ व वैयक्तिक ७६ स्पर्धकांमधून ध्वज विराज मुनोत यास एकल लहान गट लक्ष्यवेधी पुरस्कार तर अनुष्का साठे हिस एकल लहान गट उत्तम पुरस्कार मिळाला. पुरस्कार सोहळ्यास शाहीर नंदेश उमप, ज्येष्ठ सिने नाट्य अभिनेते सुनिल गोडसे व शिवशाहीर प्रवीण जाधव, बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा ॲड. नीलम शिर्के सामंत, प्रमुख कार्यवाह सतीश लोटके, कार्यकारिणी सदस्य अनंत जोशी उपस्थित होते.

परिषदेतर्फे नाट्यछटा महोत्सव, जल्लोष लोककलेचा, यहा के हम सिकंदर, दिवाळी पहाट, नाट्यानंद असे नवनवीन उपक्रम भविष्यात कायमस्वरूपी घेण्यात येणार असून बाल कलाकारांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण केले जाणार असल्याचे अहिल्यानगर परिषदेचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी सांगितले.



'इतिहास महाराष्ट्राचा' महाअंतिम फेरीत ध्वज मुनोत व अनुष्का साठे विजेते ठरले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

